**महाराष्ट्र विधानपरिषद**
**तिसरे अधिवेशन, २०२३**

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण १७, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री** | |
| **(३)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(४)** | **कामगार मंत्री** | |
| **(५)** | **उद्योग मंत्री** | |
| **(६)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(७)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(८)** | **क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री** | |
| **(९)** | **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

**सेलू (जि.वर्धा) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जाती व जमातींच्या विद्यार्थ्यांच्या अनुदान वाटपात अनियमितता झाल्याबाबत**

**(१) * २१५८३ श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.वर्धा) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या निर्वाह भत्ता आणि विद्या वेतन अनुदान वाटपात अनियमितता झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून या संस्थेतून सन २०१८ ते २०२३ या कालावधीत अनुसूचित जाती व जमाती प्रशिक्षणार्थिंना निर्वाह भत्ता आणि विद्यावेतन अनुदानाची रक्कम पूर्ण न देता निम्मी रक्कम रोख स्वरूपात देण्यात आल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभाग यांच्याकडे दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता व विद्यावेतनाची पूर्ण रक्कम देणेबाबत कोणती कार्यवाही केली तसेच रकमेत अनियमितता करणाऱ्या संस्थेतील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. श्री.बोरकर, वर्धा तक्रारदार यांनी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, वर्धा यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आर्वी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, वर्धा यांनी चौकशी समिती गठीत केली.
(२) गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने प्रशिक्षणार्थ्यांना नियमानुसार मंजूर निर्वाह भत्ता व विद्यावेतनाची रक्कम प्रशिक्षणार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करणे अपेक्षित असताना व सदर प्रशिक्षणार्थ्यांचे बँक खाते उपलब्ध असताना सुध्दा रोख रक्कम अदा करण्यात आल्याचे संस्थेतील नोंदीवरुन दिसून आले आहे. चौकशी समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार, तक्रार अंशत: खरी असल्याने प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सेलू जि.वर्धा यांना कारणे दाखवा नोटीस दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ रोजी बजावण्यात आली आहे. त्याअनुषंगाने प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सेलू, जि.वर्धा यांची विभागीय चौकशी शासनाच्या दिनांक ४ डिसेंबर, २०२३ च्या पत्राअन्वये प्रस्तावित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेचा कोट्यावधींचा निधी परत गेल्याबाबत

**(२) * २१४६५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाड्यांमधील रस्ते,वीज,पाणी तसेच कुपोषणाचा प्रश्न गंभीर असताना जिल्हा परिषदेने गेल्या दोन वर्षात शासनाकडून आलेला ४७ कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च न केल्याने परत गेल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी पशुसंवर्धन, लघुपाटबंधारे, आरोग्य, महिला व बालकल्याण व बांधकाम विभागांचा आहे, हे ही खरेआहे काय,
(३) असल्यास, पालघर जिल्ह्यात सोयी-सुविधांचा अभाव असताना मंजूर निधी खर्च न करता परत जाण्यामागील करणे काय आहेत,
(४) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनस्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षांमध्ये जिल्हा परिषदेला प्राप्त एकूण निधीपैकी काही निधी अखर्चित राहिला असून सदर अखर्चित निधी खर्च करण्यास वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ अन्वये फेब्रुवारी, २०२४ पर्यंत परवानगी देण्यात आलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभाग, ग्रामपंचायत विभाग, लघुपाटबंधारे विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग, बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग तसेच कृषी विभाग या विभागांचा निधी अखर्चित आहे.

(३) सदर निधी अखर्चित असण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत-

अ) सन २०२०-२१ दरम्यान कोविड-१९ संसर्ग प्रादुर्भावामुळे व लॉकडाऊन झाल्यामुळे अनेक कामांची मंजुरी, निविदा प्रक्रिया व अंमलबजावणी करीता विलंब झाला.

ब) जागेची कमतरता, वन विभागातील जागा व जागा मालकीच्या नसणे इत्यादी समस्यांमुळे रद्द झाली त्यामुळे वितरीत /प्राप्त निधी अखर्चित राहिला.

क) काही योजनांच्या ई-निविदा प्रक्रियेत न्युनतम निविदा प्राप्त झाल्यामुळे कामांमध्ये अंतिम खर्च झाल्यानंतरच्या बचतीच्या रकमेचाही सदर अखर्चित रकमेमध्ये समावेश आहे.

ड) सन २०२१-२२ मध्ये ९४.५५ टक्के निधी खर्च झालेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली सामान्य रुग्णालयामध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३) * २१३८२ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये फक्त ४०० खाटांची सुविधा असून सांगली जिल्हा, उत्तर कर्नाटक, कोकण, सांगोला (जि.सोलापूर), जयसिंगपूर शिरोळ, इचलकरंजी(जि.कोल्हापूर) इत्यादी परिसरातील रुग्ण या रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपलब्ध वैद्यकीय साधन सामुग्रीच्या मानाने याठिकाणी रुग्णसंख्या अधिक असून रुग्णालयात सिटी स्कॅन आणि एमआरआय या दोन्ही मशीन्स उपलब्ध नसल्याने तपासणी करण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर रुग्णालयात सिटी स्कॅन, आणि एमआरआय या दोन्ही मशीन्स उपलब्ध करुन पुरेशा वैद्यकीय सेवा पुरविण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर संस्थेस जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सीटी स्कॅन मशीन खरेदीकरीता अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. तसेच सिव्हिल हॉस्पिटल सांगली ही संस्था शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज या संस्थेशी संलग्नित असल्याने तेथे सर्व तपासण्या करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषदांमधील भरती प्रक्रियेसाठी जमा केलेल्या प्रवेशशुल्काची रक्कम अदा करण्याबाबत

**(४) * २१९९४ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.कपिल पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.महादेव जानकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१९ मध्ये शासनाने राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमध्ये गट क संवर्गातील भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला असताना मागील ४ वर्षात विविध कारणांमुळे भरती प्रक्रिया न राबविताच रद्द केली असल्याचे निदर्शनास आले असून त्यासाठी परीक्षाशुल्कापोटी बेरोजगार उमेदवारांकडून ३३ कोटी रुपये जमा करण्यात आले तथापि, आता ४ वर्षानंतर बेरोजगार उमेदवारांना त्यापैकी केवळ २१ कोटी रुपये परत केले जाणार असल्याचे दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण १३,५२१ पदाकरीता अंदाजे १३ लाख उमेदवारांनी परीक्षा शुल्क जमा केले, परंतु तांत्रिक कारणामुळे अनेक विद्यार्थ्यांना अर्ज सादर करताना ओटीपी न येणे, अर्ज सादर न होणे, युझर नेम माहित नसणे अथवा पासवर्ड ॲक्सेप्ट न होणे अशा अनेक प्रकारच्या अडचणी येत असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काचा परतावा मिळाला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चार वर्षांच्या कालावधीनंतर सदर परीक्षा रद्द केली तथापि, उमेदवारांकडून जमा केलेल्या २१ कोटी रुपयांचे उमेदवारांना अद्याप वाटप केले नसल्याचे तसेच शासनाने सन २०२३ मध्ये पुन्हा १९ हजार ४६० पदांची जाहिरात देऊन त्यासाठी १ हजार प्रवेशशुल्क ठेवले असल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १३ लाख उमेदवारांपैकी किती उमेदवारांना आतापर्यंत परतावा देण्यात आलेला आहे व उर्वरित उमेदवारांना किती कालावधीत त्यांची रक्कम परत मिळणार आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने १३ लाख उमेदवारांना त्यांची रक्कम परत मिळण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे तसेच शासनाकडे जमा झालेल्या रुपये ३३ कोटींपैकी उर्वरित राहिलेली रुपये १२ कोटींची रक्कम बेरोजगारांना अदा करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे व या प्रक्रियेस किती कालावधी अपेक्षित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे. ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक २१/१०/२०२२ अन्वये माहे मार्च, २०१९ व ऑगस्ट, २०२१ मध्ये होणारी पदभरती प्रकिया रद्द करण्यात आली असून सदर परिक्षांकरीता अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना त्यांचे परीक्षा शुल्क संबंधित जिल्हा परिषदांमार्फत परत करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(२) हे अंशत: खरे आहे. उमेदवारांना त्यांचे परीक्षा शुल्क परत करणेसाठी http://maharddzp.com या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उमेदवारांना त्यांच्या बँक खात्याचा तपशिल भरताना अडचणी येत असल्यास त्यांचेसाठी हेल्पलाईन/ तक्रार निवारणासाठी ईमेल आयडी उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यावर काही उमेदवारांच्या तक्रारी हेल्पलाईवर प्राप्त झाल्या असून त्याचे निराकरण करण्यात येत आहे.
(३) जिल्हा परिषदांना वाटप करण्यात आलेल्या रुपये २१,७०,६४,४२२/- रकमेपैकी दिनांक ३१/१०/२०२३ पर्यंत २,१५,२५८ उमेदवारांचा बँक खात्याचा तपशिल भरुन घेण्यात आलेला असून रकमेचा परतावा थेट त्यांच्या बँक खात्यावर करण्यात येत आहे. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १४/१०/२०२३ नुसार जिल्हा परिषद गट-क सरळसेवा पदभरती-२०२३ करीता परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे.
(४) व (५) दिनांक ३१/१०/२०२३ पर्यंत २,१५,२५८ उमेदवारांचा बँक खात्याचा तपशिल भरुन घेण्यात आलेला असून ८५,५६७ उमेदवारांना रुपये २,७७,७२,७५०/- इतक्या रकमेचा परतावा थेट त्यांच्या बँक खात्यावर करण्यात आला आहे. उमेदवारांकरीता बँक खात्याची माहिती भरणेसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली लिंक सुस्थितीत सुरू असून उमेदवारांकडून मागणी प्राप्त झाल्यानुसार उर्वरित रक्कम अदा करण्यासाठी जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील मेयो आणि मेडिकल रुग्णालयात औषधांचा साठा अपुरा असल्याबाबत

**(५) * २१३४५ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरच्या मेयो आणि मेडिकल रुग्णालयात फक्त २ महिने पुरेल इतका औषधांचा साठा असून हाफकिनकडून औषधांची खरेदी होत नसल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हाफकिनकडून औषधे खरेदी होत नसल्याने मेडिकल प्रशासनाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून १३ कोटी रुपयांची औषधे खरेदीचा प्रस्ताव पाठविला होता परंतु सदर प्रस्तावाला अद्याप मंजुरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औषधे आणि यंत्रसामुग्री खरेदी सुरळीत होण्यासाठी लोकप्रतिनिधींनी केलेल्या लेखी मागणीवर शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) नाही.
(२) जिल्हा नियोजन समितीने रुग्णसेवेकरीता यंत्रसामुग्री, औषधे व सर्जिकल साहित्य इ. बाबींसाठी रुपये १३ कोटीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(३) रुग्णसेवेसाठी सध्या औषधे व यंत्रसामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील पाणी टंचाईग्रस्त गावे-वाड्यांना कायमस्वरुपी पाणीपुरवठा करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(६) * २१३८८ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन "हर घर जल" आणि "जलजीवन मिशन" योजना राबवित असून, त्यावर कोट्यावधी रुपये खर्च करूनही पाणीपुरवठा विभागाने जाहीर केलेल्या अहवालानुसार राज्यातून मान्सूनचा परतीचा प्रवास पूर्ण होण्याच्या टप्प्यावर असतानाच राज्यातील ९९२ वाड्या, ३२४ गावांना टँकरने पाणीपुरवठा केला जात असून यात २८९ खाजगी आणि ३५ शासकीय टँकरचा समावेश असल्याचे तसेच नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आगामी काळात राज्यातील अनेक गावांमध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्याने शासनाने पुढील काळातील पाणी टंचाईची दाहकता लक्षात घेऊन पाणी टंचाईग्रस्त गावे-वाड्यांना कायमस्वरुपी पाणीपुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात राज्यातील ९ जिल्ह्यात ३१४ गावे व ९९२ वाड्यांना ३५ शासकीय व २८९ खाजगी असे एकूण ३२४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात आले असून नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक ८७ टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला आहे.
(२) पाणी टंचाईग्रस्त गांवे वाड्यांना कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर योजनांची कामे तातडीने पूर्ण करून त्यापासून प्रत्येक गावे व वाड्यास पाणीपुरवठा करण्याचे नियोजित आहे.

तद्‌नुसार राज्यातील भविष्यातील पाणी टंचाई निवारणार्थ पुढील नियोजनासाठी संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा सन २०२३-२४ तयार करणेबाबत या विभागाचे शासन परिपत्रक दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ अन्वये आवश्यकतेनुसार विविध उपाययोजना राबविण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामपंचायतींनी पंधराव्या वित्त आयोगातून मिळणाऱ्या निधीतील पाच टक्केही निधी खर्च न केल्याबाबत

**(७) * २२२४७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाकडून राज्यातील ग्रामपंचायतींना दरवर्षी पंधराव्या वित्त आयोगातून मिळणाऱ्या ८० टक्के निधी विकास आराखड्यानुसार कामांसाठी वितरीत करण्यात येत असताना या निधीपैकी पाच टक्केही निधी खर्च न करणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील २८ ग्रामसेवकांची तात्पुरती वेतनवाढ रोखण्यात आली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील काही ग्रामसेवकांच्या निरुत्साहामुळे जनतेच्या हिताची कामे प्रलंबित राहत असल्यामुळे जनतेला नाहक विकासापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित दोषी ग्रामसेवकांवर शासन किती कालावधीत कारवाई करणार असून संबंधित २८ ग्रामसेवकांवर शासनाने केलेल्या कारवाईचा तपशील काय आहे तसेच जिल्ह्यातील प्रलंबित विकास कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) २८ ग्रामसेवकांची एक वेतनवाढ तात्पुरती थोपविण्यात आली आहे. गट विकास अधिकाऱ्यामार्फत विकास कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत वारंवार आढावा घेण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयांमध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(८) * २१३०५ श्री.कपिल पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना तसेच अन्य नागरिकांना सर्पदंशावरील उपचार वेळेवर न मिळाल्याने त्यांचे मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माणगाव (जि.रायगड) येथील एका २२ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली असून ग्रामीण भागात सर्पदंश झाल्यास तालुका अथवा जिल्ह्याच्या ठिकाणी रुग्णाला नेईपर्यंत काही कालावधी लागत असल्याने वैद्यकीय उपचार वेळेत न मिळाल्याने अनेकांच्या जीवावर बेतण्याचे प्रकार घडत असून सर्पदंशावर लस उपलब्ध असली तरीही कोकणात सर्पदंशामुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण अधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामीण उपजिल्हा रूग्णालयात सर्पदंशाचे उपचार व्हावेत यासाठी गाव विकास समिती, रत्नागिरी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयात प्रसुतीगृह सुस्थितीत नसणे, डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे अनेक महिलांचे मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नागरिकांना वेळेवर वैद्यकीय सुविधा, महिलांसाठी सुस्थितीतील प्रसुतीगृह उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच ग्रामीण भागात सर्पदंश झालेल्या व्यक्तींना वैद्यकीय उपचार मिळण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

रूग्णालयीन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने रूग्णालय हे २४ तास सुरू असतात. सर्पदंश, श्वानदंश व इतर विषबाधा होणे हे गंभीर स्वरूपाचे आजार असल्याने रूग्णांवर तातडीने उपचार केले जावेत याकरीता सर्व आरोग्य संस्थांमध्ये उपस्थित वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी विशेषज्ञ यांचेमार्फत विशेष दक्षता घेण्यात येते व रूग्णांवर तातडीने उपचार केले जातात.

तसेच आयुक्तालयाने दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्पदंश या विषयाबाबत सर्व संस्थांना मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सर्व जिल्हास्तरीय अधिकारी व सर्व आरोग्य संस्थाप्रमुख यांना सर्पदंश या विषयावर तज्ज्ञांमार्फत प्रशिक्षित करण्यात आले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय माणगाव जि.रायगड येथे दिनांक ०५ सप्टेंबर, २०२३ रोजी दुपारी ३.३० वाजता श्री. ऋतीक संजय वाढवळ (वय २१ वर्षे) मु. कळमजे, ता.माणगाव, जि.रायगड या रुग्णास सर्पदंशामुळे अतिगंभीर अवस्थेत उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. सदर रुग्णावर रुग्णालयामध्ये तात्काळ तपासणी करुन योग्य ते औषधोपचार करण्यात आले. परंतु सदर रुग्णास सर्पदंश होऊन बराच कालावधी झाल्यानंतर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याने उपचारादरम्यान दुपारी ३.५२ वाजता रुग्णाचा मृत्यू झाला आहे.

कोकणातील सर्व रुग्णालयांमध्ये सर्पदंशावरील लस (ASV) पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून सर्पदंशाच्या रुग्णांवर तातडीने उपचार केले जातात. तसेच आपत्कालीन वैद्यकीय सेवेंतर्गत टोल फ्री १०८ क्रमांकावरील रुग्णवाहिकांमध्येही नजीकच्या आरोग्य संस्थेमधून सर्पदंश लसी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयात सर्पदंशाचे उपचार व्हावेत यासाठी गाव विकास समिती, रत्नागिरी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केलेले निवेदन स्थानिक स्तरावर प्राप्त झालेले नाही.
(३) रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामीण उपजिल्हा रूग्णालयात सर्पदंशाचे उपचार व्हावेत यासाठी गाव विकास समिती, रत्नागिरी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केलेले निवेदन स्थानिक स्तरावर प्राप्त झालेले नाही.
(४) हे खरे नाही.

कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात कार्यरत सर्व शासकीय रूग्णालयांमध्ये सर्व सोयींनी युक्त सुस्थितीतील प्रसुतीगृहे उपलब्ध आहेत. तसेच रूग्णालयांत दाखल

होणाऱ्या सर्व रूग्णांना कार्यरत वैद्यकिय अधिकाऱ्यांमार्फत सर्व आवश्यक वैद्यकिय सुविधा पुरविण्यात येत असल्याने रूग्ण आरोग्य सेवांपासून वंचित रहात नाहीत.
(५) रूग्णालयीन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने सर्व शासकीय रूग्णालयेही २४ तास सुरू असतात. सर्पदंश, श्वानदंश व इतर विषबाधा होणे हे गंभीर स्वरूपाचे आजार असल्याने रूग्णांवर तातडीने उपचार केले जावेत याकरीता सर्व आरोग्य संस्थांमध्ये विशेष दक्षता घेण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महिला कर्मचाऱ्यांशी गैरवर्तणूक करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या प्रबंधकाविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(९) * २११३७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला कर्मचाऱ्यांचा मानसिक, लैंगिक छळ, असभ्य व गैरवर्तणूक करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे प्रभारी प्रबंधक (अतिरिक्त कार्यभार) यांना पदावरून दूर करून त्यांच्या कारभाराची त्रयस्थ यंत्रणेद्वारे सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदयांकडे दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन महिला कर्मचाऱ्यांशी गैरवर्तणूक करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या प्रभारी प्रबंधकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संबंधित प्रभारी प्रबंधकांचा प्रबंधक पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी संपुष्टात आला असून शासन आदेश क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२६/अधिनियम, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ अन्वये त्यांच्याऐवजी परिषदेवर महिला प्रबंधकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच, आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांना दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये व दिनांक २ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या स्मरणपत्रान्वये चौकशी करून शासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ऐनघर (ता.रोहा, जि.रायगड) येथील विकासकामांमध्ये निधीचा अपहार झाल्याबाबत

**(१०) * २१७०४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऐनघर (ता.रोहा, जि.रायगड) गावात रस्ते, गटार, पाणीपुरवठा यासारख्या योजना केवळ कागदोपत्री दाखवून प्रत्यक्षात एकही विकासाचे काम गावात झाले नसल्याने माजी सरपंच यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास तक्रार

केल्यानंतर विस्तार अधिकारी, रोहा पंचायत समिती यांनी केलेल्या चौकशीत १ कोटी २५ लाख इतक्या रकमेचा अपहार झाला असल्याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोषींविरोधात कोणतीही कारवाई न झाल्याने माजी सरपंच यांनी ग्रामस्थांसोबत दिनांक २२ मार्च, २०२० रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण करुनही कोणतीही कारवाई होत नसल्याचे तसेच गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचा प्रकार होत असल्याने मा.मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी याचिका दाखल केली व त्यानंतरच कोर्टाच्या आदेशानुसार गटविकास अधिकाऱ्यांनी तत्कालीन सरपंच तसेच १७ सदस्य अशा सर्व दोषींवर नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असतानाही एकाही गुन्हेगारांना अटक वा कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी १ कोटी २५ लाख रुपयांचा अपहार प्रकरणी संबंधित दोषींविरोधात कायदेशीर कारवाई करण्यास विलंब केल्याने सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून जाणीवपूर्वक अधिकाराचा दुरुपयोग व कामात कसूर केल्याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: हे खरे आहे.

विस्तार अधिकारी पंचायत समिती रोहा यांच्या दिनांक १४ ऑगस्ट, २०२० च्या अहवालाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती रोहा यांचा दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजीचा फेर चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करण्यात आला होता, याप्रकरणी रुपये १९,१९,६६९/- एवढ्या रकमेची अनियामितता झाली आहे.
(२) व (३) नाही, हे खरे नाही.

या प्रकरणी संबंधित दोषी पदाधिकारी व अधिकारी/कर्मचारी यांचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे, याप्रकरणी संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल केला असून कर्तव्य कसुरीबाबत संबंधित कर्मचाऱ्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे. संबंधित दोषी कर्मचारी श्री.चिपळूणकर यांच्या दोन वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आले असून तत्कालीन ग्रामसेवक यांची विभागीय चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजपुरी (ता.मुरुड, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील खोरा बंदर जेट्टीचे काम संथगतीने सुरू असल्याबाबत

**(११) * २१७८८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजपुरी (ता.मुरुड, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील खोरा बंदरातील जेट्टी विकसित करण्यासाठी सागरमाला व शासन यांच्या माध्यमातून अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून सदर जेट्टीचे काम संथगतीने सुरू असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून सदर जेट्टीवरून पर्यटकांना जंजिरा किल्ल्यात जाण्यासाठी आणि स्थानिक कोळी बांधवांना होड्या लावता येणार असल्याने या जेट्टीचे काम निर्धारित वेळेत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील ता.मुरुड येथील राजपूरी बंदर येथील अस्तित्वातील प्रवासी जेट्टीची लांबी वाढविण्याचे कामास दिनांक ६ एप्रिल, २०२२ अन्वये रुपये ११,२६,९५,६८५/- इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन न्युनतम देकारदारास सदर कामाचे कार्यादेश दिनांक २ मार्च, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले. सदर कामाची मुदत १८ महिने (पावसाळा कालावधी धरुन) म्हणजेच दिनांक १ सप्टेंबर, २०२४ पर्यंत आहे.

सद्य:स्थितीत सदरचे काम ३५ टक्के भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले असून बारचार्ट प्रमाणे काम निर्धारीत वेळेनुसार प्रगतीपथावर आहे.

कार्यादेश नुसार सदरचे काम दिनांक १ सप्टेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील घरेलू कामगारांसाठी असणाऱ्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१२) * २१२७८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४ मध्ये तत्कालीन शासनाने वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्यामुळे अकार्यक्षम असलेल्या घरेलू कामगार महिलांना एक रकमी १० हजार रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील तुटपुंज्या सन्मान धनासाठी अटींची पूर्तता करणारी कागदपत्रे व जनजागृतीचा अभाव यामुळे राज्यात हजारो ५०/५५ वर्षावरील घरेलू कामगार महिला मोठ्या प्रमाणात असूनही केवळ १३ हजार घरेलू कामगारांना अनुदान प्राप्त झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन्मान धन ही योजना कमी महिलांपर्यंत पोहचण्याचे विशेष कारण म्हणजे महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाने दिलेल्या ओळखपत्राचे कोरोनामुळे तसेच माहिती अभावी अनेक महिलांनी नुतनीकरण केले नसल्याने हजारो महिला वयाच्या निकषात बसत असतानाही मंडळाकडून मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात १५ ते २० लाख एवढया घरेलू कामगार महिला असतानाही महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाकडे गेल्या १२ वर्षामध्ये केवळ ५ लाख २९ हजार ८४८ घरेलू कामगारांची नोंदणी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईसह राज्यात मोठ्या प्रमाणात वास्तव्य करीत असलेल्या घरेलू कामगारांच्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता तसेच त्यांच्या योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचविण्याकरीता शासनस्तरावर जनजागृती करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) घरेलू कामगारांना दिनांक ८ ऑगस्ट २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये वय वर्ष ५५ ते ६० वयोगट असलेल्या नोंदीत घरेलू कामगारांना रुपये १०,०००/- प्रमाणे ११,१३१ पात्र नोंदीत घरेलू कामगारांना सन्मानधन योजनेचा लाभ देण्यात आला व त्यानंतर ५ जानेवारी, २०२३ तसेच २५ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये १८८७ पात्र नोंदीत घरेलू कामगारांना रुपये १०,०००/- लाभ वाटप करण्यात आला.
(४) हे अंशत: खरे आहे.
(५) विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांच्या तसेच संबंधित कामगार उपायुक्त यांच्या मार्फत घरेलू कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी शिबिरे तसेच जनजागृती मेळावे आयोजित केले जातात.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील बाळकुम परिसरातील रुणवाल आयरिन या बांधकामाधीन इमारतीचे उद्‌वाहन कोसळून कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१३) * २१६६४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील बाळकुम परिसरातील रुणवाल आयरिन या बांधकामाधीन ४० मजली इमारतीच्या ३८ व्या मजल्यावरुन उदवाहन (लिफ्ट) कोसळून ३५ ते ४० वयोगटातील सहा कामगारांचा मृत्यू झाल्याची बाब दिनांक १० सप्टेंबर,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघाताची शासनाने चौकशी करुन सदर अपघातास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मे.धुव्र वुलन मिल्स प्रा.लि., रुणवाल आयरीन, बाळकुम नाका, पिरामल हेल्थ केअरजवळ, बाळकुम, ठाणे (प) या विकासकाचे ४० मजली निवासी संकुलाचे काम सन २०१९ पासून सुरु असून त्या संकुलामधील इमारत क्र. ६-सी मधील अंतर्गत टायलिंग, पेटिंग व वायरींग इ. स्वरुपाचे काम चालू असताना दिनांक १०/०९/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० च्या सुमारास टॉप फ्लोअरवरील काम संपवून कामगार लिफ्टद्वारे खाली येत असताना लिफ्टचा दोर/रोप तुटल्याने लिफ्ट कोसळून ०७ कामगारांचा मृत्यू झाला.

(२) सदर अपघाताबाबत कापूरबावडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे भा.दं.वि.सं.चे कलम ३०४(२), ३३७, ३३८ अन्वये दिनांक ११/०९/२०२३ रोजी एफ.आय.आर. क्र. ३१०/२०२३ गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर अपघाताशी संबंधित आस्थापना/ठेकेदारांनी कामगारांच्या सुरक्षेबाबत उपाययोजना न केल्यामुळे क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम, २००७ मधील नियम २६३ अन्वये इमारत क्र. ६-सी मधील बांधकामास दिनांक ११/०९/२०२३ रोजी मनाई आदेश पारित करण्यात आलेले आहेत. तसेच किमान वेतन अधिनियम, १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० अन्वये निरीक्षण करुन मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात फौजदारी खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

मा.श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांना अपघाताबाबतची माहिती व मयत कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत दिनांक ११/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.

मयत कामगाराच्या वारसास श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अन्वये ७ मयत कामगारांच्या वारसदारास देय असणाऱ्या नुकसान भरपाईपोटीच्या रकमेपैकी रुपये ६०.०० लाख इतकी आगाऊ रक्कम सहा मयत कामगारांच्या वारसदाराच्या बँक खात्यामध्ये प्रत्येकी रुपये १०.०० लाख प्रमाणे NEFT द्वारे जमा करण्यात आलेली असून ऊर्वरित रक्कम रुपये ३५,७६,३००/- श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांचे न्यायालयात ठेकेदारांनी जमा केली आहे. तसेच एका मयत कामगाराचे वारसदाराची माहिती प्राप्त न झाल्याने त्यांचे वारसदारास नुकसान भरपाईपोटी देय असलेली रक्कम रुपये ८,८०,५७५/- श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांचे न्यायालयात ठेकेदारांनी जमा केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यामध्ये औद्योगिक वसाहत क्षेत्रासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनींमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याबाबत

**(१४)** * **२१५३७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यामध्ये डोंगरगाव, मंगरुळ, रजाळवाडी व मोडा या गावांमध्ये शासकीय गायरान जमिनीसोबत शेतकऱ्यांची ७०० हेक्टर जमीन औद्योगिक वसाहत क्षेत्रासाठी संपादित करताना पहिल्या टप्प्यातील मोजणीच्या वेळी मंगरुळ ग्रामपंचायत समोर स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध करताना आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना घडल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमीनींबाबत स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात न घेता त्यांच्यासोबत कोणतीही सुनावणी न घेता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राजकीय दबाव वापरुन शासकीय बाजार मुल्य वाढवून न देता जुन्या दराने जमिनी संपादित करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डोंगरगाव येथे घेण्यात आलेल्या विशेष ग्रामसभेमध्ये गावातील ५००० शेतकऱ्यांनी एम.आय.डी.सी. साठी संपादित करण्यात येणाऱ्या भूसंपादनाला विरोध करुन खाजगी जागेवर होणारा प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एम.आय.डी.सी.च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जागेची पाहणी करुन शेंद्रा, बिडकिन एम.आय.डी.सी.मध्ये पंचतारांकित सुविधा असलेले औद्यौगिक भूखंड शिल्लक असल्याने पहिल्या टप्प्यात केवळ शासकीय जमिनीवर औद्योगिक वसाहत उभारुन या क्षेत्रात उद्योग सुरु झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात खाजगी जमिनीचे भूसंपादन करावे असे शासनास सादर करण्यात आलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासकीय जागेवर औद्योगिक वसाहत सुरु करुन तेथे उद्योग स्थापन झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात औद्योगिक वसाहत सुरु करण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांसोबत चर्चा करुन त्यांना त्यांच्या जमिनीकरीता बाजार मुल्यापेक्षा जास्त दराने रक्कम देण्याबाबत तसेच पर्यायी शेतीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर औद्योगिक क्षेत्राच्या संयुक्त मोजणीचे काम दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ पासून सुरु करण्याचे निश्चित करण्यात आले होते. तथापि, प्रत्यक्ष कामास दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ पासून सुरुवात करण्यात आली.

सदरील घटना ही प्रत्यक्ष मोजणी दरम्यान घडली नाही. तथापि, दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ च्या दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रामध्ये आत्महत्येचा प्रयत्न केल्याबाबतच्या घटनेची बातमी प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले.

(२) हे खरे नाही.

सदर प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रासाठी अद्याप दरनिश्चिती करणेत आलेली नाही. प्रस्तुत प्रकरणी मऔवि अधिनियमान्वये भूसंपादन हे वाटाघाटीने होणार आहे. अद्याप वाटाघाटीची प्रक्रिया सुरु झालेली नाही. वाटाघाटीने दर अंतिम करण्यात आल्यानंतरच भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येते.

(३) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी ग्रामपंचायत कार्यालय, डोंगरगाव येथे ग्रामसभा घेतली होती. सदर सभेमध्ये प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रातील भूसंपादनास विरोध असल्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला असून, ४४६ ग्रामस्थांच्या स्वाक्षरीचे निवेदन दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी मऔवि महामंडळास प्राप्त झालेले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सदर प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रासाठी अद्याप दरनिश्चिती करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ज्युबिलंट इन्ग्रोव्हिया या केमिकल कंपनीत स्फोट होऊन कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत

**(१५) * २१७७२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर व बारामतीच्या (जि.पुणे) सिमेवर असलेल्या ज्युबिलंट इनग्रेव्हिया या केमिकल कंपनीत दिनांक २ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास सुरक्षा मानकांची अंमलबजावणी न केल्याने हलगर्जीपणामुळे प्रकल्पाची स्वच्छता सुरु असताना मोठा स्फोट होऊन एका कामगाराचा मृत्यू व ५ कामगार जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीमध्ये प्राथमिक उपचाराची सुविधा उपलब्ध असून मागील ६ महिन्यांपासून फॅक्टरी मेडिकल ऑफिसर उपलब्ध नसल्यामुळे गंभीर जखमी झालेल्या कामगारांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशत: खरे आहे. ज्युबिलंट इनग्रेव्हिया लिमिटेड, निंबुत, ता.बारामती, जि.पुणे या कारखान्यात दिनांक २ सप्टेंबर, २०२३ रोजी इथाईल ॲसीटेट प्लांट क्र. ०५ मध्ये रिबॉयलरच्या साफसफाईचे काम करत असताना अचानक आग (Flash Fire) लागल्याने एकूण तीन कामगारांना भाजले. त्यापैकी एका कामगाराचा दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजी मृत्यू झाला असून दोन जखमी कामगारांना औषधोपचारानंतर सोडण्यात आले असून हे कामगार कामावर रुजू झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) रिबॉयलरची साफसफाई करण्यासाठी योग्य सुरक्षीत कार्यप्रणाली अवलंबण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले असून त्यामुळे सदर घटना घडली असल्याचे दिसून आले आहे. योग्य सुरक्षीत कार्यप्रणाली अवलंबण्यात आली नसल्याचे निदर्शनास आल्याने सदर कारखान्याच्या भोगवटादार / व्यवस्थापकास दिनांक २१/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वयें निरिक्षण शेरा पारीत केले आहेत. तसेच दिनांक २६/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यास अनुसरुन कारखाने अधिनियम १९४८ मधील ७ -अ (२) (क) व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील नियम ७३-क मधील तरतुदींचा भंग झाल्याने कारखाने अधिनियम, १९४८अंतर्गत भोगवटादाराविरुध्द एक खटला आणि व्यवस्थापकाविरुध्द एक खटला असे एकूण दोन खटले मा.अतिरिक्त मुख्य न्यायाधीश, पुणे यांच्याकडे दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आडाळी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) औद्योगिक क्षेत्रात नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) * २१७३१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) येथील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने आडाळी येथे साडेसातशे एकर जमीन खरेदी करून औद्योगिक क्षेत्र जाहीर केले असून सदर औद्योगिक क्षेत्रातील आखणी केलेल्या २१० भुखंडातील डोंगर,जंगल झाडे, रस्ते व प्लॉटचे सपाटीकरण मागील १० वर्षांपासून न झाल्याने व पुरेश्या प्रमाणात नागरी सुविधा उपलब्ध नसल्याने अद्याप येथे पूर्ण क्षमतेने उद्योग सुरू झाले नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकांमार्फत सदर क्षेत्रामध्ये उद्योग सुरु करावेत अशी निवेदने प्राप्त झाली असून आडाळी औद्योगिक वसाहतीतील पायाभूत सुविधांची कामे अंतिम टप्प्यात असून भूखंड वाटपाची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आडाळी औद्योगिक क्षेत्रात सर्व नागरिक व मूलभूत सेवा उपलब्ध करून सदर औद्योगिक क्षेत्र बेरोजगारांसाठी खुले करण्याबाबत शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नव्याने विकसित झालेल्या आडाळी औद्योगिक क्षेत्राकरीता आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविणेबाबतची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. यातील काही कामे पूर्ण झालेली असून, काही कामे प्रगती पथावर आहेत. तसेच मऔवि महामंडळामार्फत आडाळी औद्योगिक क्षेत्रामधील भुखंडांच्या वाटपास सुरुवात करण्यात आली आहे. १४ भुखंडाचे वाटप करण्यात आले असून, १९० भुखंडांकरीता ऑनलाईन माध्यमातून अर्ज मागविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील एम.आय.डी.सी. तील प्रसोल कंपनीत झालेल्या विषारी वायुगळतीमुळे कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत

**(१७) * २११३२ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील एम.आय.डी.सी.तील प्रसोल कंपनीत मोठ्या प्रमाणावर झालेल्या विषारी वायुगळतीमुळे एका कामगाराचा मृत्यू झाल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू दुर्घटनेस जबाबदार असलेल्या दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, खरे आहे.
(२) या घटनेत कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७-A(२)(a) आणि महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चे नियम ७३-H (१) चे उल्लंघन आढळुन आले असल्याने, मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, अलिबाग, जिल्हा-रायगड यांचे न्यायालयात कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द दोन खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच सदर दुर्घटनेबाबत पोलीस विभागामार्फत भारतीय दंड विधान कलम ३०४ (अ), ३३७, २८६, २८४,३४ अन्वये दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यांच्या दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या आदेशान्वये सदर कारखान्यास उत्पादन बंदचे आदेश बजावले आहेत. सदर आदेशाप्रमाणे सदर कंपनी व्यवस्थापनाने नवीन उत्पादन करणे बंद केल्याचे कळविले आहे.अपघात झाल्यानंतर कामगार कायद्यांतर्गत निरीक्षण शेरे देण्याच्या अनुषंगाने आवश्यक असणारे सदर कंपनीचे अभिलेख सादर करण्यास कंपनीच्या व्यवस्थापनास उप आयुक्त, कामगार यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील स्त्रीभ्रूणहत्या रोखण्याबाबत**

**(१८) * २२१८८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सचिन अहिर, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रसुतीपुर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध (पीसीपीएनडीटी) कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने "आमची मुलगी" हे संकेतस्थळ सुरु केले असून यावर लिंगनिदान करणाऱ्या डॉक्टर, सोनाग्राफी केंद्र यांच्याविरुध्द तक्रार करता येते, परंतु गेली चार वर्षापासून सदर संकेतस्थळ बंद पडले असून गर्भलिंग निदानाबाबत स्टेट सुपरवायजरी बोर्डाची मिटींग ही मागील तीन वर्षापासून झालेली नसल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रजनन आणि माता आरोग्य सुधारण्यासाठी कार्यरत असलेल्या युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंड (युएनएफपीए) या संस्थेकडून सन २०११ मध्ये सदर वेबसाईट सुरु करण्यात येऊन वेबसाईट हाताळण्याची जबाबदारी परामर्श सोल्यूशन या संस्थेला देण्यांत आली असून सदर वेबसाईटला "युएनएफपीए" या संस्थेकडून शासनाच्या आरोग्य विभागाला दरवर्षी मिळणारे आर्थिक सहाय्य सन २०१९ पासून बंद झाले असून सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागानेदेखील वेबसाईट सुरु राहण्यासाठी कोणताही निधी दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गर्भलिंग निदान चाचण्यांवर नियंत्रण ठेवून राज्यात मुलींची कमी झालेली संख्या लक्षात घेता "आमची मुलगी" ही बंद पडलेली शासनाची वेबसाईट पुन्हा सुरु करण्यासंदर्भात व स्त्री भ्रूणहत्या थांबववून मुलींच्या जन्मदरात वाढ होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

"आमची मुलगी" हे संकेतस्थळ सन २०१९ पासून बंद आहे. मात्र, प्रसुतीपुर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या राज्य पर्यवेक्षकीय मंडळाची बैठक मागील तीन वर्षात दिनांक २५ मे, २०२१ आणि दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ रोजी घेण्यात आली असून या वर्षातील बैठक प्रस्तावित आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.

"आमची मुलगी" या संकेतस्थळाला "युएनएफपीए" या संस्थेकडून मिळणारे आर्थिक सहाय्य सन २०१९ पासून बंद झाले आहे. सदर संकेतस्थळ हाताळणारी परामर्श सोल्युशन ही संस्थाही बंद झाल्याने सदर संस्थेस संकेतस्थळ सुरु ठेवण्यासाठी निधी देता आलेला नाही.
(३) सदर संकेतस्थळ हाताळणाऱ्या परामर्श सोल्युशन्स संस्थेस संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र सदर संस्थेकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे सद्य:स्थितीत सदर संकेतस्थळ बंद आहे.

सदर संकेतस्थळ बंद असले तरी राज्यात मुलींचा जन्मदर वाढविण्यासंदर्भात खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात येत आहेत-

- राज्यामध्ये सर्व सोनोग्राफी केंद्रांची नोंदणी करण्यात येते.
- राज्यात १८००-२३३-४४७५ हा पीसीपीएनडीटीची टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक सुरु करण्यात आला असून या हेल्पलाईन क्रमांकावर राज्यातील कोणतीही सर्वसामान्य व्यक्ती पीसीपीएनडीटी कायद्याच्या उल्लंघनाबाबत व गर्भलिंग निदानाबाबत तक्रार दाखल करु शकते. सदर तक्रारीची समुचित प्राधिकारी यांच्यामार्फत खातरजमा करण्यात येते व चौकशी करून दोषींविरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.
- जिल्हा/म.न.पा समुचित प्राधिकारी यांच्यामार्फत सर्व सोनोग्राफी केंद्राची दर तीन महिन्यांनी तपासणी करण्यात येते व पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रावर कायदेशीर कारवाई करण्यात येते.
- गर्भलिंग निदान करीत असल्याचा संशय आलेल्या सोनोग्राफी केंद्रावर बनावट गर्भवती (डिकॉय) महिलेच्या सहाय्याने स्टींग ऑपरेशन करुन गर्भलिंग निदान होत नसल्याची खात्री करण्यात येते व दोषी आढळल्यास कायदेशिर कार्यवाही करण्यात येते.
- खबरी बक्षीस योजनेंतर्गत पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांबाबत माहिती देणाऱ्या व्यक्तीस संबधितांविरुध्द न्यायालयीन खटला दाखल झाल्यास रुपये १,००,०००/- बक्षीस म्हणून दिले जाते.
- मा.न्यायालयामार्फत दोषारोपपत्र दाखल झालेल्या डॉक्टरांची नावे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव राज्य वैद्यकीय परिषदेकडे पाठविण्यात येतात.

- विविध स्तरावर शिबीरे व कार्यशाळा आयोजित करून मुलगी वाचवा या विषयावरील प्रदर्शन आयोजित करणे, समाजमाध्यमे व प्रसार माध्यमांतून जनजागृती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा रूग्णालयाचे बांधकाम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(१९) * २१५४४ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा रुग्णालय बांधकामाला सन २०१६ मध्ये मंजूरी मिळाली असून प्रथम १०० खाटांचे रूग्णालय बांधकामाबाबत निधी मंजूर होवून १६ कोटी रुपये खर्च होवून अद्यापही उर्वरीत निधी अभावी रूग्णालयाचे बांधकाम प्रलंबित असून त्यामध्ये आवश्यक अशा आरोग्य विषयक सोयी- सुविधा उपलब्ध नाहीत तसेच अतिरिक्त ४०० खाटांचे रूग्णालय तसेच फायर सेफ्टी तथा मॉडयुलर ओ.टी. रॅम्प व शवविच्छेदन गृहाच्या कामासाठी ४४ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरीता प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणतर्फे या परिसरात ४० खाटांचे नेत्र रूग्णालय निर्माण करण्याचे मंजूर करण्यात आले होते,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने प्रलंबित निधी तसेच प्रस्तावाला मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) नाही.

प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर परिसरात १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय आणि जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय बांधकामाच्या रुपये ४४.३३ कोटीच्या अंदाजपत्रक व आराखड्यास शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) होय.

डागा रुग्णालय नागपूर येथे अस्तित्वात असलेले नेत्र वार्ड व नेत्रशस्त्रक्रियागृह येथून नविन उडाणपुलाचे बांधकाम सुरु होत असल्याने सदर नेत्र वार्डाची इमारत पाडण्यात येणार आहे. सदरहू नेत्रवार्ड पुर्ववत सुरु ठेवण्यासाठी जिल्हा रुग्णालय नागपूर येथील आवारात उपलब्ध जागेवर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,भारत सरकार, नागपूर यांचे मार्फत सदरहू बांधकाम करुन देणार असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी त्यांचे पत्र दिनांक ६ जुलै, २०२३ अन्वये कळविले आहे. सद्य:स्थितीत डागा रुग्णालय येथे नेत्र रुग्णालय कार्यान्वित आहे.

(३) प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर परिसरात १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय व जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय बांधकामाचे रुपये ४४.३३ कोटी इतक्या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कामगार कल्याण मंडळाच्या मध्यान्ह भोजन योजनेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२०) * २१८६२ श्री.एकनाथराव खडसे, श्री.राजहंस सिंह, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत पाटील, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र इमारत बांधकाम व इतर बांधकामे कामगार कल्याण मंडळाकडून कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविली जात असून सदर योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याने सदर गैरव्यवहाराची चौकशी करुन दोषीवर कारवाई करणेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे पत्रव्यवहार केला असून शासनाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार जळगाव जिल्ह्यात सदर योजनेवर २ कोटी रुपयांचा अपेक्षित असलेला खर्च २८ कोटी रुपयापर्यंत करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील २६ जिल्ह्यात बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह व रात्र कालीन जेवण योजना माहे ऑगस्ट, २०२१ पासून सुरू केली गेली असून जळगाव, ठाणे, पालघर, नाशिक, रायगड, अहमदनगर जिल्ह्यात भोजन पुरविण्यासाठी मे.इंडो अलाईड प्रोटीन फुड्स प्रा. लि. या कंपनीसोबत करार केला गेला असून सदर योजनेवरील खर्च रुपये दोन कोटींवरून रुपये २८ कोटी २५ लाखांवर पोहोचला असून लाभार्थींच्या संख्या तेरा पटीने वाढल्याचे तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान झालेल्या दुर्लक्षामुळे बांधकाम मजुरांऐवजी दुसऱ्याच याद्यांना मंजुरी दिली गेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साकेगाव (ता.भुसावळ) ग्रामपंचायतीने दिनांक ५ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास वेळू माता मंदिर येथे सुरू असलेल्या बांधकाम साइटवर ८११ कामगारांना भोजन पुरवण्याबाबतचे पत्र देण्यात आले असून प्रत्यक्षात मंदिर परिसरात या काळात कोणतेही बांधकाम झालेले नसल्याचे तसेच १ हजार २०० मतदार असलेल्या वसंतवाडी (ता.जळगाव) या ग्रामपंचायतीने केलेल्या मागणीनुसार दिनांक १२ मार्च, २०२३ पासून १ हजार १७४ कामगारांना भोजन दिल्याची तफावतही दिसून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने एका जिल्ह्यासाठी ह्या योजनेच्या माध्यमातून झालेल्या खर्चाचे प्रमाण जास्त असल्याने सर्व जिल्हयांना या योजनेचा समांतर लाभ मिळवून देण्याबाबत तसेच सदर योजनेत मोठ्या प्रमाणावर झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजनेबाबतची कागदपत्रे व माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक २७/०८/२०२३ रोजी पत्र प्राप्त झालेले आहे.

(२) राज्यातील नाशिक जिल्ह्यात माहे सप्टेंबर-२०२१, अहमदनगर जिल्ह्यात माहे ऑक्टोबर-२०२१ नाशिक व जळगाव जिल्ह्यात माहे सप्टेंबर-२०२२ मध्ये, ठाणे जिल्ह्यात माहे मार्च-२०१९, पालघर जिल्ह्यात माहे डिसेंबर-२०२० आणि रायगड जिल्ह्यात माहे जून-२०२१ मध्ये मध्यान्ह भोजन योजना सुरू करण्यात आली असून सदर जिल्हयांकरीता मे. इंडो अलाईड प्रोटीन फूड्स प्रा.लि. या पुरवठादार संस्थेची निवड करण्यात आली आहे.

जळगाव जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये ५,९५५ नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांचे भोजनाकरीता रु २.०४ कोटी खर्च झाला असून माहे जून, २०२३ मध्ये ७५,०६३ नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करण्यात आलेल्या मध्यान्ह व रात्री भोजनांकरीता रुपये २८.२५ कोटी खर्च झालेला आहे. माहे ऑक्टोबर २०२२ च्या तुलनेत माहे जून २०२३ मध्ये १२.६० पटीने लाभार्थी संख्येत वाढ झाली आहे.

सदर योजनेच्या अंमलबजावणी कार्यपध्दतीनुसार संबंधित जिल्हयांच्या बांधकाम आस्थापना, कंत्राटदार व ग्रामसेवक यांनी वेळोवेळी केलेल्या मागणी आणि मागणीपोटी सादर केलेल्या बांधकाम कामगार यादीच्या आधारेच नोंदीत/अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह व रात्री भोजन वितरीत करण्यात आलेले आहे. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत कोणतेही दुर्लक्ष झालेले नाही. तसेच बांधकाम कामगारांच्या ऐवजी दुसऱ्याच याद्यांना मंजुरी दिली गेल्याची बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

(३) ग्रामपंचायत कार्यालय, साकेगाव, ता.भुसावळ, जि.जळगाव यांनी दिनांक ०५/०३/२०२३ व ग्रामपंचायत कार्यालय, वसंतवाडी, ता. व जि.जळगाव यांनी दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सहायक कामगार आयुक्त, जळगाव यांना दिलेल्या बांधकाम कामगारांच्या यादीच्या आधारेच भोजनाचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच भोजन प्राप्त झाल्याबाबतची नोंदही संबंधित ग्रामसेवक यांनी डिलिवरी चलनावर केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाडा (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२१) * २११८३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १२२ शाळांची अत्यंत दुरवस्था झाली असल्यामुळे येथील सुमारे साडे आठ हजार विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आला असल्याचे माहे ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वाडा पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडून पाठविण्यात आला असतानाही त्याला अद्याप मंजूरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात माहिती घेऊन व सदर प्रस्तावावर निर्णय घेऊन या शाळांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही. पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २९३ शाळांपैकी १५ शाळांमधील २४ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या आहेत.
(२) व ३) पंचायत समिती, वाडा यांनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये पाठविलेल्या ८२ जि.प. शाळांच्या १४१ वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीच्या प्रस्तावापैकी १७ जि.प. शाळांमधील २६ वर्गखोल्यांच्या दुरुस्तीच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरित दुरुस्तीची कामे टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ५८ गावांमधील पाणीपुरवठा योजना प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रलंबित असल्याबाबत

**(२२) * २१९२५ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यात जलस्वराज्य योजना भाग २ राबविण्याचा व त्यामध्ये भीषण पाणी टंचाई असलेल्या मौजे फुरस ((ता.जावळी,जि.सातारा) या गावांसह ५८ गावांचा समावेश करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार ४ वर्षांपूर्वी निवड झालेल्या या गावांमध्ये साठवण टाक्या बांधकामाचा निर्णय घेण्यात आला असल्याचे तसेच सदर ५८ गावांमध्ये शासकीय अधिकाऱ्यांनी ही योजना विहित कालावधीत न राबविल्यामुळे व दरम्यानच्या काळात या योजनेस जागतिक बँकेने मुदतवाढ देण्यास नकार दिला असल्याने केंद्र शासनाने सदर योजनाच बंद केली असल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, योजनेस जागतिक बँकेचे आर्थिक पाठबळ असताना केवळ संबंधित शासकीय अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता, निष्काळजीपणा व नियोजन शुन्यतेमुळे सदर ५८ गावांना पाण्यापासून वंचित रहाण्याची पाळी आल्यामुळे तसेच जागतिक बँकेचा निधी समर्पित करावा लागल्यामुळे त्या अधिकाऱ्यांविरोधात चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून शासनास करण्यात आल्याचेही माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर मागणीसंदर्भात तसेच पाणी टंचाईग्रस्त सदर ५८ गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय.

शासन निर्णय क्र.जस्वप्र-०७१६/प्र.क्र.९८/पापु-११, दिनांक २०/०९/२०१९ अन्वये जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत ५८ टंचाईग्रस्त गावे, वाड्या-वस्त्या यांच्याकरीता करावयाच्या उपाययोजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. यामध्ये रायगड जिल्ह्यातील ५२, रत्नागिरी जिल्ह्यातील ०२ व सातारा जिल्ह्यातील फुरस गावासह ०४ योजनांचा समावेश होता.

(२) व (३) जलस्वराज्य-२ कार्यक्रमाची मुदत ही सन २०१४ पासून दिनांक ३१/०३/२०२० अशी होती. शासन निर्णय क्र.जस्वप्र-०७१६/प्र. क्र. ९८/पापु-११, दिनांक २०/०९/२०१९ अन्वये जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत ५८ टंचाईग्रस्त गावे, वाड्या-वस्त्या यांच्याकरीता करावयाच्या उपाययोजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

तथापि, दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ पासून राज्य विधानसभा निवडणुक आचार संहिता लागू झाल्यामुळे तत्कालिन परिस्थितीत या योजनांच्या अंमलबजावणी करीता निविदा प्रक्रिया हाती घेण्यात आली नाही. यामध्ये शासकीय अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमता/निष्काळजीपणाची बाब आढळून आलेली नाही.

जलस्वराज्य-२ कार्यक्रमाचा कालावधी दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंतच असल्याने जागतिक बँक व केंद्र शासन यांना जलस्वराज्य-२ कार्यक्रमास मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात आली होती.त्यानुसार सदर कार्यक्रमास काही अटी व शर्तींच्या अधीन राहून सहा महिन्यांची म्हणजेच दिनांक ३०/०९/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्यामध्ये केंद्र शासनाच्या अर्थ कार्य विभागाकडून मुदतवाढ कालावधीत कुठल्याही नवीन कामांची निविदा प्रसिध्द करण्यात येणार नाही या अटीच्या अधीन राहून मुदतवाढ दिली. तसेच या योजनांच्या अंमलबजावणीसाठी जागतिक बँकेकडून कर्ज स्वरुपात निधी प्राप्त होणे अपेक्षित होते, तथापि, जागतिक बँक यांनी मार्च, २०२० अखेर पूर्ण झालेल्या कामांनाच केवळ निधी (वित्तीय प्रतिपुर्ती) वितरीत करण्याच्या अटीवर कार्यक्रमास मुदतवाढ दिली. यास्तव सदर योजनांची निविदा प्रक्रिया जलस्वराज्य-२ अंतर्गत करण्यात आली नाही.

सदर कार्यक्रमास प्रोग्राम फॉर रिझल्ट या साधनांतर्गत मिळणारे अर्थसहाय्य उद्दीष्टपूर्ती आधारित निधी संवितरण निर्देशकांशी निगडीत होते व स्वतंत्र यंत्रणेमार्फत उद्दीष्टपूर्तीची खात्री झाल्यानंतर जागतिक बॅंकेकडून अर्थसहाय्य प्राप्त होत होते. यामुळे जागतिक बॅंकेचा निधी समर्पित करण्याचा प्रश्न उद्‍भवत नाही.तसेच जागतिक बँकेचा निधी समर्पित करावा लागल्यामुळे त्या अधिकाऱ्यांविरोधात चौकशी करुन कारवाई करण्याच्या मागणीबाबत ग्रामस्थांकडून शासनास पत्र/ निवेदन प्राप्त झाल्याचे कार्यालयीन अभिलेखावरून दिसून येत नाही.

(४) सदरच्या ५८ टंचाईग्रस्त गावे, वाड्या-वस्त्यांचा समावेश जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना/ स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजनांतर्गत समावेश करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हा रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करणेबाबत

**(२३) * २२१९७ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्याला मंजूर असलेले जिल्हा रुग्णालयाचे प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८ मध्ये वैद्यकीय शिक्षण विभागाने जिल्हा रुग्णालय मनुष्यबळासह वर्ग केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा रुग्णालय कार्यान्वित न झाल्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयावर रुग्णांचा ताण वाढत असून खाटांची संख्या कमी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) शासन निर्णय, दिनांक १७/०१/२०१३ अन्वये लातूर येथे १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. सदर रुग्णालयाच्या इमारतीसाठी कृषी विभागाच्या अधिनस्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या अंतर्गत कृषी महाविद्यालय, लातूर यांची सर्वे नं.३७ मधील १० एकर जमीन उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

जिल्हाधिकारी, लातूर कार्यालयांतर्गत जिल्हानिबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक यांच्या कार्यालयाकडून वार्षिक मूल्यदर तक्ता सन २०२३-२४ नुसार रुपये ३,३२,६८,६५०/- इतके मूल्यांकन असल्याचे आणि सदर रक्कम सार्वजनिक आरोग्य विभागाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे कृषी व पदुम विभागाने कळविले आहे. सदर पूर्ण रक्कम सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अर्थसंकल्पित तरतूदीतून तूर्त अदा करणे शक्य नसल्याने कृषी व पदुम विभागाच्या सहमतीने सदर रक्कम तीन वर्षाच्या कालावधीत ४०%, ३०%, ३०% अशाप्रकारे अदा करुन महसूल विभागामार्फत ताबा हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने कंत्राटी शिक्षक भरती करण्याचे धोरण रद्द करण्याबाबत

**(२४) * २१६१३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, ॲड.अनिल परब, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध विभागांतील १३८ संवर्गातील शासकीय पदे कंत्राटी कंपन्यांमार्फत भरण्याचा निर्णय शासनाने घेतला असून कंत्राटी पध्दतीने शिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी ९ पुरवठादारांना परवानगी दिली असल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शिक्षकांना कोणतीही सेवा सुरक्षा नाही, सेवानियम नाही, ५ वर्षे वेतनवाढ नसल्याने सदर निर्णयास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी व समाजातील विविध घटकांनी विरोध दर्शविला असून कंत्राटी पध्दतीने भरती करण्याच्या शासनाच्या निर्णयाला विरोध करत एका व्यक्तीने मंत्रालयात उडी मारल्याची घटना घडली असल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने फेरनिर्णय घेवून सदर प्रस्तावित कंत्राटी पध्दतीने भरती करण्याचे धोरण रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) राज्यातील विविध विभाग/कार्यालयात बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी कामगार विभागाने ९ सेवापुरवठादार संस्था/एजन्सीच्या पॅनलला दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली होती. त्यामध्ये कुशल, अतिकुशल, अर्धकुशल व अकुशल या चार वर्गावारीमध्ये एकूण १३८ वेगवेगळ्या पदांचा अंतर्भाव करण्यात आला होता.या १३८ पदामध्ये कुशल वर्गवारीत शिक्षक व सहायक शिक्षक ही पदे सुध्दा समाविष्ट करण्यात आली होती.
(२), (३) व (४) या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टात सेवा पुरवठादार एजन्सी व संबंधित मनुष्यबळ यांना अनुज्ञेय अनुक्रमे सेवा शुल्क व मानधन याचा तपशील नमुद केला असून या शासन निर्णयासोबतच्या SOP मध्ये मनुष्यबळासाठी विविध अटी व सेवाशर्ती सुध्दा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. सदर पॅनलचा कालावधी शासन निर्णयाच्या दिनांकापासून ५ वर्षाचा होता.तसेच उक्त कालावधीत मनुष्यबळाच्या दरमहा दरामध्ये कोणतीही वाढ अनुज्ञेय राहणार नसल्याचे शासन निर्णयात नमुद करण्यात आले होते.

दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ रोजी मंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्याच्या रिलींगवरुन सुरक्षा जाळीवर उडी मारलेल्या व्यक्तीने या शासन निर्णयाच्या विरोधात सदर कृती केली नसून प्रकल्पग्रस्त म्हणून शासकीय नोकरीत सामावून घेण्यासाठी सदर कृती केली असल्याचे प्रथम खबर अहवाल (FIR) वरुन स्पष्ट होते.

याशिवाय, या विभागाचा दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजीचा शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजी रद्द करण्यात आला आहे.

-----------------

## शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये ९ खेळांना वगळण्यात आल्याबाबत

**(२५) * २२०७० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्कुल फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने ६७ व्या शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये ९ खेळांना राष्ट्रीय शालेय स्पर्धेतून वगळण्याच्या निर्णयामुळे सदर क्रीडा प्रकारांमध्ये खेळणाऱ्या खेळाडूंना ग्रेस गुण, नोकरी मधील ५% आरक्षण व इतर सुविधांचा लाभ मिळू शकणार नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या क्रीडा विभागाकडून यावर पुनर्विचार करण्याची मागणी स्कुल फेडरेशन ऑफ इंडिया कडे करण्यात यावी, अशी मागणी संबंधित ९ क्रीडा प्रकारातील खेळाडूंनी आणि संघटनांनी शासनाकडे केली असून मा.मंत्री क्रीडा यांनी योगासनाचा समावेश क्रीडा प्रकारात करण्याचे आश्वासन माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील ९ क्रीडा प्रकारातील खेळाडूंना दिलासा देण्याबाबत तसेच विशेष बाब म्हणून सकारात्मक निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्य शासनामार्फत आयोजित राज्यस्तरीय स्पर्धामधील ४९ क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा खेळणाऱ्या खेळाडूंना ग्रेस गुण सुविधेचा लाभ मिळतो.

(२) व (३) योगासन हा खेळप्रकार शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत समाविष्ठ आहे. राज्यस्तरीय स्पर्धामधील ४९ खेळ प्रकारापैकी राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत समाविष्ठ नसलेल्या १० खेळांचा समावेश, राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये समाविष्ठ करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इतर राज्यांमध्ये आयुर्वेद पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय कोट्यातून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जात असल्याबाबत

**(२६)** * **२१९०० श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर राज्यांमध्ये केवळ साडेपाच वर्षाचे पदवी शिक्षण घेतल्यामुळे महाराष्ट्राचे मूळ रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय कोट्यातून आयुर्वेद पदव्युत्तर पदवी (एमडी, एमएस) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज करण्यासही अपात्र ठरविले जात असल्याने राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना घटनात्मक आरक्षणाला मुकावे लागत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अन्यायकारक नियमात शासनाने बदल करण्याची मागणी आयुर्वेद विद्यार्थ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त नियमात बदल करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) राज्यातील आयुर्वेद महाविद्यालयातील आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्था (आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी (समचिकित्सा) पाठ्यक्रमांच्या पदव्युत्तर प्रवेशाचे विनियम) नियम, २०१६ व संबंधित प्रवेशासाठी निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन माहिती पुस्तिकेच्या आधारे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाव्दारे अखिल भारतीय स्तरावर आयोजित AIAPGET प्रवेश परिक्षेच्या गुणवत्तेनुसार केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे केले जातात. त्यामुळे इतर राज्यात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय कोट्यातून प्रवेश दिला जात नाही.

(२) होय.

(३) केद्र शासनाने विहीत केलेल्या “ऑल इंडिया कोटा (१५%)” अंतर्गत विद्यार्थ्याने अन्य राज्यात पदवी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेऊन अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असल्यास अशा उमेदवारांना राज्याच्या कोट्यातील जागांवर प्रवेश घेण्यासाठी पात्र ठरविले आहे.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या नियमपुस्तिकेत नियम क्र/०२/३. समाविष्ट करण्यात आला आहे. तथापि, ज्या विद्यार्थ्यांनी वैयक्तिकरित्या राज्याबाहेरील महाविद्यालयातून पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, अशा (खुल्या/मागासवर्ग प्रवर्गातील) विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठी राज्यस्तरीय कोट्यातील जागांकरीता पात्र ठरविण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२७) * २१७६६ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी १, समुदाय आरोग्य अधिकारी ६, आरोग्य सहाय्यक ४, आरोग्य सहाय्यिका ४, आरोग्य सेविका १०, आरोग्य सेवक ११, औषध निर्माण अधिकारी २, कनिष्ठ सहाय्यक १ अशी एकूण ३९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय, सदर पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ग्रामीण रुग्णालयात रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रूग्णालय, तेल्हारा, जि.अकोला या आरोग्य संस्थेत खालील पदे सेवानिवृत्ती, बदली इत्यादी कारणांमुळे रिक्त आहेत :-

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदसंख्या | केव्हापासून रिक्त |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधीक्षक, गट-अ | १ | दिनांक ०१/०६/२०२३ |
| २ | वैद्यकीय अधिकारी, गट-अ | २ | दिनांक ०१/०६/२०२३ |
| ३ | दंत शल्यचिकित्सक, गट-ब | १ | दिनांक ०१/०७/२०२३ |
| ४ | कनिष्ठ लिपिक, गट-क | १ | दिनांक ०१/०९/२०२३ |
| ५ | अधिपरिचारिका, गट-क | ३ | दोन वर्षापासून रिक्त |
| ६ | औषधी निर्माता, गट-क | १ | दिनांक ११/०९/२०२३ |
| ७ | क्ष - किरण तंत्रज्ञ, गट-क | १ | दिनांक ०१/०६/२०२२ |
| ८ | वाहन चालक, गट-क | १ | दिनांक ०१/०१/२०२३ |
| ९ | शिपाई, गट-ड | १ | दिनांक ०१/०८/२०२३ |
| १० | दंत सहाय्यक, गट-ड | १ | सन २०१२ पासून रिक्त |
| | एकूण १३ | | |

(३) वैद्यकीय अधिकारी, गट-अ च्या रिक्त पदांवर तदर्थ वैद्यकीय अधिकारी भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. तसेच, गट- क ची अधिपरिचारिका / औषध निर्माता / क्ष-किरण तंत्रज्ञ ही तांत्रिक पदे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन घेऊन रुग्णसेवा सुरळीतपणे देण्यात येते.

उर्वरित गट-अ व गट-ब ची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच गट-क व गट-ड ची पदे भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द झालेली असून पदभरतीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात "लेक माझी लाडकी" योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२८) * २१४१९ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजहंस सिंह, श्री.प्रसाद लाड, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनामार्फत माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मुलींच्या सक्षमीकरणाकरीता लेक माझी लाडकी या नवीन योजनेची घोषणा करण्यात आली असून यात पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यावर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत गेल्यावर ६ हजार रुपये, सहावीत गेल्यावर ७ हजार रुपये, ११ वीत गेल्यावर ८ हजार रुपये, १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये असा एकूण प्रत्येक मुलीस १ लाख १ हजार रुपये एवढा लाभ मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक १ एप्रिल, २०२३ नंतर कुटुंबात जन्मणाऱ्या १ अथवा २ मुलींना त्याच प्रमाणे १ मुलगा व १ मुलगी असल्यास मुलीला या योजनेचा लाभ मिळणार असून दुसऱ्या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास १ मुलगी किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ मिळेणार असून निधीअभावी या योजनेची अदयापही अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) राज्यात मुलींच्या सक्षमीकरणासाठी सुरू केलेल्या "लेक लाडकी" या योजनेंतर्गत पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यानंतर जन्माला येणाऱ्या १ अथवा २ मुलींना तसेच १ मुलगा व १ मुलगी असल्यास मुलीला या योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे. याशिवाय दुसऱ्या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास १ मुलगी अथवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे. शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ अन्वये सदर योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालयाच्या अधिनस्त क्षेत्रिय यंत्रणांना योजने संदर्भात अर्ज स्वीकारण्याबाबत कळविण्यात आले असून योजनेची अंमलबजावणी प्रक्रिया सुरू केली आहे.

तसेच या योजनेकरीता नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्यात आले असून त्या अंतर्गत निधीची तरतूद उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) येथे अतिरिक्त जिल्हा रुग्णालय निर्माण करण्याबाबत

**(२९) * २२११६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) या आदिवासी बहुल अतिदुर्गम तालुक्यातील आदिवासी बांधवांना सक्षम आरोग्य सुविधा मिळत नसून जव्हार येथील पतंगशहा कुटीर रुग्णालय हे उपजिल्हा दर्जाचे रुग्णालय असून त्याची केवळ शंभर खाटांची क्षमता असून रुग्णालयातील डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे तसेच सिटीस्कॅन, सोनोग्राफी सुविधाही उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे २०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित असून जव्हार, मोखाडा व विक्रमगड या तीन तालुक्यांचा भार एका रुग्णालयावर असल्याने येथे अतिरिक्त जिल्हा रुग्णालय निर्माण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरेशी आरोग्य कर्मचाऱ्यांची संख्या तसेच सिटीस्कॅन, सोनोग्राफी तसेच २०० खाटांची सुविधा या मागण्यांबाबत तसेच अतिरिक्त जिल्हा रुग्णालय निर्माण करण्याच्या मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जव्हार, जि.पालघर येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित आहे. उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथील मंजूर १०७ पदांपैकी ६२ पदे भरलेली असून ४५ पदे रिक्त आहेत. रुग्णालयामध्ये सोनोग्राफ़ी मशिन सुविधा उपलब्ध आहे. तथापि, सी.टी. स्कॅनची सुविधा उपलब्ध नाही

(२) हे खरे आहे.

(३) शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०१२ अन्वये कुटीर रुग्णालय, जव्हारचे २०० खाटांच्या रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यात आले आहे. परंतुउपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे जागा कमी असल्याने जागेअभावी २०० खाटांचे रुग्णालयाचे बांधकाम अद्याप सुरु करता आलेले नाही. सदरहू रुग्णालयाच्या बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन ती जिल्हा शल्यचिकित्सक यांचे नावे करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे सोनोग्राफी सुविधा उपलब्ध असून सी.टी.स्कॅन सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) वरीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## चौल (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायतीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३०) * २२३२५ श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौल (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायतीमधील सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांनी पदाचा दुरुपयोग करुन मोठ्या प्रमाणात केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग,नवी मुंबई यांच्याकडे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ ते २०२१ या कालावधीत लेखा परिक्षण अहवालात उक्त ग्रामपंचायतीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे नमुद करण्यात आले असून अन्य गंभीर मुद्द्याची नोंद करण्यात आली असूनही अद्यापि सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौल (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायतीमधील गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) ग्रामपंचायत चौल चे सन २०१८-२०१९ ते २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेले असून लेखापरीक्षण अहवालात गंभीर मुद्यांची नोंद घेण्यात आलेली नाही. तथापि, काही प्रशासकीय अनियमितता आढळून आलेल्या आहेत, त्याबाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती अलिबाग यांचे स्तरावरून सर्व संबंधितांना नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**कोरोनामध्ये पती गमावलेल्या महिलांना उपजिविकेसाठी देण्यात येणाऱ्या रकमेत वाढ करण्याबाबत**

**(३१) * २१४८६ डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १७१९० ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनामुळे कुटुंबातील पती गमावलेल्या महिलांच्या उपजीविकेसाठी तसेच माता किंवा पिता गमावलेल्या अनाथ बालकांच्या संगोपनासाठी शासनाकडून प्रति महिना ११०० रुपये देण्यात येत असून ही रक्कम अडीच हजार रुपये करण्याचे आश्वासन मा.मंत्री महोदयांकडून माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले असतानाही अद्याप त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालसंगोपन योजनेंतर्गत मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये चार हजार रुपये दिले जात असल्याने सदर रक्कम अडीच हजार रुपये करण्याची व महिलांच्या रोजगारासाठी पंडिता रमाबाई व्याजमाफी योजनेंतर्गत महिला बचत गटांना एक लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनांच्या अंमलबजावणीकरीता शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

या विभागाच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये बालसंगापेन योजनेंतर्गतच्या परिपोषण अनुदानात रुपये १,१००/- वरून रुपये २,२५०/- वाढ करण्यात येवून व संस्थेस देण्यात येणारे प्रतिबालक प्रतिमहा अनुदानात रुपये १२५/- वरून रुपये २५०/- इतकी वाढ करण्यात येवून या योजनेंतर्गत अनुदानात एकूण रुपये २,५००/- इतकी वाढ करण्यात आली आहे. सदरची वाढ ही दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून लागू करण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.
(३) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेंतर्गत अनुदानात वाढ करण्यात आली आहे. तसेच उद्योग विभागामार्फत स्वयंरोजगाराकरीता तसेच महिला उद्योजकांकरीता साधर्म्य असलेल्या राज्यातील महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण- २०१७ व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राबविण्यात येत असल्याने महिला व बालविकास विभागामार्फत ‘पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी महिला उद्योजक योजना’ राबविण्याची आवश्यकता नाही. मात्र अशा महिलांना उद्योग विभागाने त्यांच्या योजनेत प्राथम्याने लाभ देण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्याची विनंती उद्योग विभागास शासनपत्र दिनांक १७ मार्च, २०२३ अन्वये करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वेळापूर (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथे १०० खाटांचे उपजिल्हा रूग्णालय उभारण्याबाबत**

**(३२) * २१७१२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेळापूर (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील २० गावे व वाड्यांमध्ये जवळपास १ लाख नागरिक वास्तव्यास असून सद्य:स्थितीत या ठिकाणी एक प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून येथील आरोग्य व्यवस्था तुटपुंजी असल्याने आरोग्य सेवेवर जास्त प्रमाणात ताण येत असून पुरेशा उपचाराअभावी रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेळापूर येथील नागरिकांना आवश्यक ते वैद्यकीय उपचार वेळेवर उपलब्ध होण्याबाबत तसेच वेळापूर हे केंद्रीय राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ व इंदापूर-अकलूज-सांगोला या राज्यमार्गापासून जवळ असल्याने या ठिकाणी १०० खाटांचे उपजिल्हा रूग्णालय उभारण्याची मागणी येथील स्थानिक नागरिकांकडून होत असून मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वेळापूर (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथे १०० खाटांचे उपजिल्हा रूग्णालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शासनाची याबाबत नेमकी भूमिका काय असून याबाबतची कार्यवाही शासन किती कालावधीत करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, वेळापूर अंतर्गत ८ गावांचा समावेश असून त्यांची लोकसंख्या ४९,२३३ इतकी आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत ८ उपकेंद्र कार्यरत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र वेळापूर ची वार्षिक बाह्यरुग्ण संख्या २५ ते २६ हजार सरासरी इतकी असून दररोज १८० ते २२० पर्यंत बाह्यरुग्ण सेवा तसेच मासिक २५० ते ३०० पर्यंत अंतररुग्ण सेवा दिली जाते.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र वेळापूर ता.माळशिरस जि.सोलापूर चे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयाकडून प्रस्ताव प्राप्त होताच उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर ग्रामीण रुग्णालयातील महिलेचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याबाबत**

**(३३) * २११३८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर ग्रामीण रुग्णालयात एका २९ वर्षीय तरुणीची प्रसूती झाल्यानंतर अत्यवस्थ झाल्याने सिल्वासा येथे वैद्यकीय उपचारासाठी नेताना ऑक्सिजन सिलिंडर सेवा न मिळाल्याने तिचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तरुणीच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

श्रीम. कल्याणी किशोर अंग्रे ही ३८ वर्षीय महिला दिनांक १९ सप्टेंबर, २०२३ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजता प्रसूतीकरीता ग्रामीण रुग्णालय, पालघर येथे दाखल झाली होती. कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकारी यांनी तिची तपासणी करून बाळाचे ठोके कमी झाल्यामुळे व पहिल्या खेपेस सिझेरीयन प्रसूती असल्यामुळे सदरील महिलेची रुग्णालयातील स्त्रीरोग तज्ञ तसेच वैद्यकीय अधिकारी यांनी रात्री १०.२० वाजता सिझेरियनद्वारे प्रसूती केली. तथापि, दिनांक २० सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी ०६.३० वाजता सदर महिलेला श्वास घेण्यास त्रास होत असल्याने स्त्रीरोग तज्ञ व वैद्यकीय अधिकारी ह्यांनी तपासणी केली असता श्वासाची गती वाढल्याने व सदर महिलेची प्रकृती गंभीर असल्याने नातेवाईकांच्या विनंतीवरून तिला सकाळी ८.३० वाजता पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णवाहीकेने सेल्वासा, गुजरात येथे संदर्भित करण्यात आले. संदर्भित करताना मातेला प्राणवायू चालू होता. तसेच रुग्णवाहीकेत संपूर्ण भरलेले २ ऑक्सिजन सिलेंडर व २ आंतरवासिता डॉक्टर यांच्यासह रूग्णाससंदर्भित करण्यात आले होते.

(२) सदर प्रकरणी चौकशी समिती नेमून कर्तव्यावरील स्त्रीरोग तज्ञ, वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारिका, वाहनचालक यांची चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीत कोणताही अधिकारी व कर्मचारी दोषी असल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत आयोजित परिक्षेतील**
**उत्तीर्ण उमेदवारांना नोकरी देण्याबाबत**

**(३४) * २१८११ श्री.जयंत पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.कपिल पाटील, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (एमआयडीसी) सन २०१९ अंतर्गत गट "क" व गट "ड" मधील एकूण १४ संवर्गातील पदे भरण्यासाठी दिनांक १७ जुलै, २०१९ रोजी महामंडळाकडून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जाहिरातीनुसार ५०२ पदे ऑनलाईन परीक्षेद्वारे तर ३६३ पदे ऑफलाईन परीक्षेद्वारे भरण्यात येणार असून त्यासाठी प्रत्येक विद्यार्थी/उमेदवारांकडून परीक्षा शुल्क म्हणून प्रत्येकी रुपये ५००/- इतके शुल्क जमा करुन घेण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिक्षेचा निकाल दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लावण्यात आला असून त्यामध्ये उत्तीर्ण झालेल्यांना नोकरी देण्याऐवजी (२०२३ मध्ये) सदर परीक्षा रद्द केली परंतु परिक्षेत उत्तीर्ण झालेल्यांना अद्याप नोकरी तसेच परीक्षा शुल्काची रक्कम देखील परत करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महामंडळाने एकीकडे सन २०१९ मधील परीक्षा रद्द केली असून त्याऐवजी दिनांक १३ ऑगस्ट, २०२३ मध्ये ३४ संवर्गाच्या ८०२ पदांच्या भरतीसाठी नव्याने प्रसिध्द केलेल्या जाहिरातमध्ये "ड" संवर्गाचा समावेश केला नसल्याचे तसेच प्रति उमेदवारास किती परीक्षा शुल्क आकारण्यात येणार याचाही स्पष्ट उल्लेख केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ एमआयडीसी प्राधिकरणाची सदर परीक्षा रद्द करण्याची तसेच दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ नुसार सुधारित आकृतिबंध अंतिम न होण्याची कारणे काय आहेत,
(६) असल्यास, उत्तीर्ण झालेल्यांना नोकरी देण्याबाबत व उर्वरित उमेदवारांचे परीक्षा शुल्क परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सरळसेवा भरती २०१९ अंतर्गत स्पर्धा परिक्षेसाठी खुला प्रवर्गाकरीता रुपये ७००/- व मागासवर्गीय प्रवर्गाकरीता रुपये ५००/- याप्रमाणे परीक्षा शुल्क आकारण्यात आले होते.
(३) अंशत: खरे आहे.

मऔवि महामंडळातील सरळसेवेच्या भरतीप्रक्रियेसाठी १४ संवर्गापैकी ११ संवर्गाच्या एकूण ५०२ पदांकरीता दिनांक २०/०८/२०२१ ते दिनांक २७/०८/२०२१ या कालावधीमध्ये ऑनलाईन स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. सदर परिक्षेचा निकाल दिनांक १५/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आला होता.त्यापैकी १० संवर्गाची सुधारीत निवड व प्रतिक्षा यादी दिनांक ०७/०३/२०२२ रोजी प्रसिध्द करुन एकूण ४४६ पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्रे देण्यात आलेली आहेत.

वाहनचालक,शिपाई व मदतनीस या संवर्गाच्या परीक्षा घेण्यात आलेल्या नसल्यामुळे त्यांचे परीक्षा शुल्क परत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच लघुलेखक(निम्न श्रेणी) या संवर्गाच्या स्पर्धा परीक्षा घेतलेल्या असून, गुणवत्ता यादीतील उमेदवारांची व्यावसायिक परीक्षा घेणे शक्य झालेले नसल्यामुळे या संवर्गाची भरतीप्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.
(४) अंशत: खरे आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ३१/१०/२०२२ नुसार ज्या विभाग/कार्यालयांचा सुधारित आकृतिबंध अद्याप तयार झालेला नाही अशा विभाग /कार्यालयातील गट -अ,गट-ब व गट क मधील (वाहनचालक व गट ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात येत आहे असे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे २०२३ च्या भरती प्रक्रियेमध्ये वाहनचालक व ड संवर्गाचा समावेश केलेला नाही. तथापि, जाहिरातीमध्ये नमूद संवर्गासाठी परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे घेण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे:-

१) खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी -रुपये १,०००/-

२) मागासवर्गीय/आ.दु.घ/अनाथ/दिव्यांग-रुपये ९००/-

३) माजी सैनिक/दिव्यांग माजी सैनिकांना परीक्षा शुल्क आकारलेले नाही.

(५) माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दिनांक २१ जानेवारी, २०२१च्या शासन निर्णयानुसार राज्य शासनाच्या पॅनलवरील एजन्सी मे. ॲपटेक लिमिटेड या एजन्सीची नेमणुक महामंडळातील स्पर्धा परीक्षा धेण्यासाठी करण्यात आली होती. त्यानुसार ११ संवर्गाच्या एकूण ५०२ पदांकरीता ऑनलाईन स्पर्धा परीक्षा दिनांक २०/०८/२०२१ ते दिनांक २७/०८/२०२१ या कालावधीत घेण्यात येऊन सदर परीक्षेचा निकाल दिनांक १५/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आला. तसेच सुधारित निवड व प्रतिक्षा यादी दिनांक ०७/०३/२०२२ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

तथापि, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दिनांक १८ जानेवारी, २०२२ च्या शासन निर्णयानुसार शासनाने सदर पॅनल रद्द केल्यामुळे उर्वरित संवर्गासाठीच्या परीक्षा घेता आलेल्या नाहीत. त्यामुळे महामंडळाने वाहनचालक, शिपाई, मदतनीस या संवर्गाची परीक्षा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. तसेच लघुलेखक (निम्न श्रेणी) या संवर्गाच्या स्पर्धा परीक्षा घेतलेल्या असून, गुणवत्ता यादीतील उमेदवारांची व्यावसायिक परीक्षा घेणे शक्य झालेले नसल्यामुळे या संवर्गाची परीक्षा रद्द करुन त्याचे सूचनापत्र महामंडळाच्या संकेतस्थळावर दिनांक ०४/०८/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे.

मऔवि महामंडळाचा सुधारित आकृतिबंध अंतिम करण्याचे काम सुरु असून, सदर आकृतिबंध तयार झाल्यावर त्यास शासन मान्यता घेण्यात येईल.

(६) १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२ नुसार, मऔवि महामंडळातील भरती प्रक्रिया २०१९ अंतर्गत महामंडळाने दिनांक ०७/०३/२०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारित निवड व प्रतिक्षा यादीची विधीग्राहयता दि ०६/०३/२०२२ रोजी संपुष्टात आली आहे. सदर कालावधीमध्ये भरती प्रक्रियेतील स्पर्धा परीक्षेमध्ये निवड यादीतील १० संवर्गातील एकूण ४४६ पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्रे देण्यात आली असून, सदर उमेदवार कर्तव्यावर रुजू झालेले आहेत.

२. वाहनचालक, शिपाई, मदतनीस या संवर्गाची परीक्षा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली असून, ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना परीक्षा शुल्क परत करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

३. लघुलेखक(निम्न श्रेणी) या संवर्गाच्या स्पर्धा परीक्षा घेतलेल्या असून, गुणवत्ता यादीतील उमेदवारांची व्यावसायिक परीक्षा घेणे शक्य झालेले नसल्यामुळे या संवर्गाची भरतीप्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यातील बाल न्याय मंडळ आणि बाल कल्याण समितीकडे ४० हजार प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३५) * २१२३२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४५८२ ला दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाल न्याय कायद्यातील तरतुदीनुसार बाल न्याय मंडळ आणि बाल कल्याण समिती समोर प्रकरण आल्यानंतर पुढील चार महिन्यांच्या कालावधीत ते निकाली काढणे आवश्यक असताना बाल न्याय मंडळाकडे १० हजारांहून अधिक व बाल कल्याण समितीकडे ३० हजारांहून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बाल गुन्हेगारीची वाढती संख्या पाहता सदरहू प्रलंबित प्रकरणे निकाली काढून पीडित बालकांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) अंशतः खरे आहे.

माहे ऑक्टोबर, २०२० ते सप्टेंबर, २०२३ या ३ वर्षामध्ये बाल कल्याण समितींसमोर दाखल एकूण ५१७४४ प्रकरणांपैकी ४७५४० निकाली काढलेली असून एकूण प्रलंबित प्रकरणे ४२०४ इतकी आहेत.

माहे ऑक्टोबर, २०२० ते सप्टेंबर, २०२३ या ३ वर्षामध्ये बाल न्याय मंडळांसमोर दाखल एकूण २७८३४ प्रकरणांपैकी १०२८१ निकाली काढलेली असून एकूण प्रलंबित प्रकरणे १७५३३ इतकी आहेत.

(२) शासन पत्र दिनांक ७ नोव्हेंबर, २०२३ अन्वये सर्व बाल न्याय मंडळे व बाल कल्याण समित्यांना त्यांचेकडे प्रलंबित प्रकरणांचा निपटारा त्वरेने करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच बाल न्याय मंडळे व बाल कल्याण समित्यांना त्यांचेसमोर प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत तसेच आवश्यक ते सर्व सहाय्य करण्याबाबत सर्व संबंधित यंत्रणांना सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये जलजीवन मिशन योजनेतंर्गत निकृष्ट दर्जाची कामे झाल्याबाबत

**(३६) * २१५२५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील ७७ ग्रामपंचायतींमध्ये जलजीवन मिशन योजनेंतर्गत प्रत्येक घरामध्ये पाणीपुरवठा करण्यासाठी ९२ कामे सुरु करण्यात आली असून अद्याप एकही काम पूर्ण झाले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत कामे करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारांकडे निविदेमध्ये नमुद करण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार कोणतीही व्यवस्था नसतानाही स्थानिक अधिकारी यांनी आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना कामे दिल्याने करण्यात येणारी कामे ही निकृष्ट दर्जाची होत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोखरी इजारा येथील सदर योजनेंतर्गत करण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम पडून दोन कामगार जखमी होऊनही कंत्राटदारावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी महागाव तालुक्यामध्ये जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोखरी, करंजखेड तसेच इतर ठिकाणी निकृष्ट बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारांना काळया यादीत टाकून त्यांच्यावर गुन्हे नोंद करण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

सदर योजनांची कामे करण्याकरीता शासन धोरणानूसार ई- निविदा प्रक्रिया राबविण्यात येवून कंत्राटदारांना कामे देण्यात येतात. तसेच सदर योजनांच्या कामाचा दर्जा शासनाने नेमुन दिलेल्या त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासण्यात येतो. त्यानुषंगाने कामे निकृष्ट असल्याबाबत जिल्हाधिकारी यांचेकडून अहवाल आलेले नाहीत.
(३) व (४) पोखरी इजारा येथील पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू असताना कॉंक्रीट लिफ्टच्या सेंट्रींगला धक्का लागल्याने स्लॅब कोसळून दोन कामगार किरकोळ जखमी झाले होते. त्यांच्यावर त्वरीत उपचार करण्यात आले असून, कोणतीही गंभीर दुखापत झालेली नाही. पोखरी इजारा येथील अपघाताची अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत सविस्तर चौकशी करण्यात आली असून, सदर घटना अपघात असल्याने कंत्राटदारास योग्य ती काळजी न घेतल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तसेच सदर कामाची EMD जप्त करून, जिल्हा परिषद अंतर्गत पाणी पुरवठ्याची ६ महिण्यापर्यंत कामे न घेण्याबाबत दंडात्मक कारवाई केली आहे. उर्वरित कामासाठी नव्याने निविदा प्रक्रीया करण्यासाठी समितीमध्ये ठराव घेतला आहे.

मौ.करंजखेड येथील कामाबाबत कार्यकारी अभियंता, उपअभियंता तसेच त्रयस्थ तपासणी यंत्रणामार्फत प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली असता काम योग्य असल्याचे प्राथमिक स्वरूपात निदर्शनास आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चाकण (जि.पुणे) ग्रामीण रुग्णालयात सोयी-सुविधा मिळत नसल्याबाबत

**(३७) * २१७३३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) शहरातील ग्रामीण रुग्णालयात आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध नसून सर्वसामान्य नागरिक आणि कामगारांना पुरेसे उपचार देखील मिळत नाहीत तसेच रुग्णालयात स्वच्छतेचा अभाव असून पिण्याचे स्वच्छ पाणी, बाथरूम यासारख्या आणि इतर मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रुग्णालयात पिण्याचे स्वच्छ पाणी तसेव बाथरूम यासारख्या आणि इतर मूलभूत सोयी सुविधा पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) नाही.

(२) ग्रामीण रुग्णालयात पिण्याचे स्वच्छ पाणी तसेच बाथरुम यासारख्या आणि इतर मूलभूत सुविधा रुग्णालयात उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हा क्रीडा संकुलाच्या देखभाल दुरुस्तीबाबत

**(३८) * २२२४२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा क्रीडा संकुलातील इनडोअर स्टेडीअम व मैदानाच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असून संबंधित जागेचा वापर जनावरे चरण्यासाठी, दारु पिण्यासाठी व जुगार खेळण्यासाठी होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्केटींग ट्रॅक,गोळा फेक,लांब उडी ट्रॅक बुजुन गेले आहेत तसेच इनडोअर स्टेडीअमच्या परिसरातील फरश्या फुटल्या असून महिला खेळाडुंसाठी चेंजींग रुम नसून इमारतीवर झाडे उगवल्याने क्रीडा संकुलाची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू क्रीडा संकुलाच्या दुरुस्ती, देखभाल व स्वच्छतेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) जिल्हा क्रीडा संकुल सोलापूर साठी १६ एकर एवढी जागा उपलब्ध असून, संकुलाच्या रुपये ८७८.६१ लक्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता देऊन रुपये ८००.०० लक्ष इतका निधी त्यावर खर्च झालेला आहे.

सदर संकुलामध्ये खुले प्रेक्षागृह, ४०० मी. धावनपथ, जलतरण तलाव, बॅडमिंटन हॉल, लॉन टेनिस, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो- खो मैदाने, वसतिगृह, व्यापारी गाळे, योगा हॉल, क्रीडा साहित्य, कार्यालयीन इमारत, पाणी, ड्रेनेज व विद्युत व्यवस्था, प्रवेशद्वार व संरक्षक भिंत सुविधांची कामे पूर्ण असून, नागरिक व खेळाडू मार्फत क्रीडा सुविधांचा वापर करण्यात येत आहे. या संकुलाच्या आजूबाजूस झोपडपट्टीचा भाग असून, संरक्षक भिंत अनेक वेळा दुरुस्त करुनही स्थानिकांकडून ती पाडण्यात येत असल्यामूळे तिथे जनावरांचा शिरकाव होत आहे. यावर महापालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी सद्य:स्थितीत या ठिकाणी सुरक्षारक्षकांची व्यवस्था करण्यात आली असून, मद्यपी व जुगार खेळणाऱ्यांच्या बंदोस्ताकरीता पोलीस प्रशासनाला कार्यवाहीबाबत कळविले आहे. महिला खेळाडुकरीता संकुलाच्या वसतिगृहातील चेंजिंगरूमचा वापर करण्यात येत आहे.

शासन निर्णय, दिनांक २३/०३/२०२२ अन्वये संकुलाची अनुदान मर्यादा सुधारित करण्यात आली असून, सदर संकुलासाठी रुपये १५००.०० लक्ष सुधारित अनुदान मर्यादा आहे. संकुलाचे रुपये १५६९.२२ लक्षचे सुधारित अंदाजपत्रक प्राप्त झाले असून, त्यामधून संकूलामधील चेंजिंगरुमसह, विविध क्रीडा सुविधांचे नुतनीकरण व अद्ययावतीकरण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सिकलसेल रूग्णांच्या मृत्युच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत**

**(३९) * २१५४५ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सिकलसेलग्रस्त रूग्णांच्या मृत्युत दरवर्षी वाढ होत असून शासकीय रूग्णालयात सिकलसेल ग्रस्तांच्या उपचाराकरीता हिमॅटॉजिस्ट विशेष तज्ञांची कमी असल्यामुळे या मृत्यूच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिकलसेल रूग्णांच्या औषधोपचारासाठी हायड्रोक्सीयुरीया हे औषध शासकीय रूग्णालयात रुग्णांकरीता मोफत उपलब्ध नसल्याने तथा औषधाचा साठा कमी असल्याने रूग्णसंख्येत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आवश्यक उपचार पध्दती व औषधी साठा तसेच हिमॅटॉजिस्ट डॉक्टर प्रत्येक हिमॅटॉजिस्ट सेंटरला उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सिकलसेल नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सद्य:स्थितीत अंदाजे २३,००० सिकलसेल रुग्णांचे निदान करण्यात आले आहे. सर्व जिल्ह्यात शासकीय संस्थांमध्ये हिमॅटॉजिस्ट ऐवजी फिजीशियन, बालरोग तज्ञ व वैद्यकीय अधिकारी उपलब्ध असून त्यांचे मार्फत सिकलसेल रुग्णांवर उपचार करण्यात येतात. तसेच वैद्यकीय अधिकारी, तंत्रज्ञ, समुपदेशक, एएनएम व आशा यांचेद्वारे प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून विवाहपूर्व व विवाहपश्चात समुपदेशक करण्यात येते.

सद्य:स्थितीत राज्यामध्ये सिकलसेल रुग्णांच्या उपचारासाठी व वापरात येणारे अंदाजे १,७३,००० हायड्रोक्सीयुरीया टॅबलेट्स उपलब्ध आहेत. तसेच सिकलसेल रुग्णांना आवश्यकतेनुसार हायड्रोक्सीयुरीया वेळेत उपलब्ध होण्यासाठी राज्य स्तरावरुन जिल्हयांना रुपये २०.०० लक्ष अनुदान वितरीत करण्यात आले असून त्यामधून रुग्णांना आवश्यकतेनुसार हायड्रोक्सीयुरीयाचा पुरवठा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा सर्वोपचार रुग्णालयात मनुष्यबळासह सोयी सुविधा पुरविण्याबाबत

**(४०) * २१७६२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा सर्वोपचार रुग्णालयाची क्षमता केवळ ४७६ व रुग्णांची संख्या ३ हजार पेक्षा अधिक होत असल्यामुळे रुग्णालयात सुमारे ३ हजार पेक्षा जास्त रुग्ण दर दिवशी उपचार घेण्यासाठी येत असल्याने रुग्णालय प्रशासनावर मोठा भार पडत असून रुग्णांना औषधोपचार मिळणे कठीण झाले असून एका कॉटवर २ ते ३ रुग्ण सामावून घेण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ नसल्यामुळे डॉक्टर्स, परिचारिका, सफाई कामगार व वॉर्ड बॉय यांच्यावर प्रचंड ताण पडत असून रुग्णसेवेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रुग्णालयात पुरेश्या प्रमाणात मनुष्यबळ तसेच आवश्यक सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरणेबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.
वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील पद भरती प्रक्रिया संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व संस्थास्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर तालुक्यात ट्रॉमा केअर सेंटर स्थापन करण्याबाबत

**(४१) * २२११९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक महामार्ग, मुंबई-कसारा रेल्वेमार्ग आणि भविष्यात समृद्धी महामार्ग जाणाऱ्या शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात एकही ट्रॉमा केअर सेंटर स्थापन करण्यात आले नसल्याने अनेकदा अपघातग्रस्त अत्यवस्थ रुग्णांचा मुंबई-ठाणे येथे उपचारार्थ नेताना मृत्यू होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मुंबई-नाशिक महामार्ग, मुंबई-कसारा रेल्वेमार्ग आणि भविष्यात समृद्धी महामार्गावर होणाऱ्या अपघातांचे प्रमाण लक्षात घेता समृद्धी महामार्ग व इतर ठिकाणी पाच ट्रॉमा सेंटर स्थापन करण्याबाबत घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यात शहापूर तालुक्याचा समावेश आहे काय, नसल्यास, त्यामागील करणे काय आहेत,
(४) असल्यास, शहापूर येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत शासनाची भूमिका काय आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) ट्रॉमा केअर सेंटर स्थापन करण्यात आलेले नाही.

तथापि, शासकीय रुग्णालयात दाखल होणाऱ्या अपघाती रुग्णांवर वेळेवर औषध उपचार करण्यात येतात. अतिदुखापत झालेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालय, ठाणे किंवा वैद्यकीय महाविद्यालयात पुढील उपचारासाठी संदर्भित केले जाते.
(२) समृद्धी महामार्गावर होणाऱ्या अपघातांचे प्रमाण लक्षात घेता समृद्धी महामार्ग व इतर ठिकाणी पाच ट्रॉमा सेंटर स्थापन करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत घोषणा केलेली नाही.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.
(४) शहापूर येथे राज्य शासनाचे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित आहे.

शासन निर्णय दिनांक १८/०९/२०२० अन्वये राज्यात ट्रॉमा केअर युनिट स्थापन करणेबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे.

या धोरणानुसार नवीन लेवल-३ ट्रॉमा केअर युनिट सुरु करण्यास मान्यता देताना ते जिल्हा रुग्णालय/ सामान्य रुग्णालय/ उपजिल्हा रुग्णालय (१०० खाटा) या ठिकाणी मंजूर करण्यात यावे. तसेच दोन ट्रॉमा केअर युनिटमधील अंतर १०० ते २०० कि.मी. असणे आवश्यक असल्याचे निश्चित करण्यात आले आहे.

सद्य:स्थतीत ठाणे जिल्ह्यात जिल्हा रुग्णालय, ठाणेआणिसामान्य रुग्णालय, उल्हासनगर येथे ट्रॉमा केअर युनिट मंजूर असून ते कार्यरत आहे. या दोन ट्रॉमा केअर युनिटपासून ते शहापूर उपजिल्हा रुग्णालय आणि खर्डी येथील अंतर हे ७० कि.मी. च्या आत असल्याने शहापूर येथे ट्रॉमा केअर युनिट स्थापन ही बाब दिनांक १८ सप्टेंबर, २०२० मधील निकषात बसत नाही. त्यामुळे शहापूर येथे ट्रॉमा केअर युनिट स्थापन करता येऊ शकत नाही.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## भाईंदर (जि.ठाणे) येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर तसेच आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४२) * २११३९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (जि.ठाणे) येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात अत्यवस्थ व गंभीर अवस्थेतील रुग्णांवर उपचार करण्यास तज्ज्ञ डॉक्टर, आवश्यक सोयी-सुविधा नसल्याने रुग्णांना अन्य रुग्णालयात पाठविण्यात येत असल्याचे तसेच अत्यवस्थ व गंभीर रुग्णांचा वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळल्याने मृत्यू होत असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर, आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच रुग्णांचे होत असलेले मृत्यू रोखण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयात मवैआसे गट-अ (वेतनस्तर एस-२३) मध्ये एकूण १८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी, ९ पदे भरलेली व ९ पदे रिक्त आहेत. तसेच मवैआसे गट-अ (वेतनस्तर एस-२०) मध्ये एकूण २८ पदे मंजूर असून ती सर्व भरलेली आहेत.

सदर रुग्णालयातून दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी ०६ रुग्णांना पुढील उपचारार्थ वरिष्ठ रुग्णालयात संदर्भित करण्यात आले आहे. सदर रुग्णांपैकी तीन रुग्णांना जिल्हा रुग्णालय ठाणे येथे संदर्भित केले होते. एक रुग्ण फॅमेली केअर हॉस्पीटल, मिरारोड येथे संदर्भित केले आहे व दोन रुग्ण के.ई.एम. रुग्णालय, मुंबई येथे संदर्भित केले आहेत. तथापि, या रुग्णालयात दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी सदर कालावधीत वैद्यकीय उपचार न मिळाल्याने कोणत्याही रुग्णांचा मृत्यू झालेला नाही.

(२) वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदोन्नतीने तसेच नामनिर्देशनाने पदे भरण्याची प्रक्रिया चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात रस्ते तसेच आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत

**(४३) * २१६८४ श्री.जयंत पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापुर येथील पटकीचा पाडा येथे राहणाऱ्या गर्भवती महिलेला कसाऱ्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्यामुळे जंगलातील पायवाटेवरून डोलीमधून जात असतानाच कळा असह्य झाल्यामुळे रस्त्यातच प्रसूती झाल्याची घटना घडली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पटकीचा पाडा ते वेळूक या किमान चार ते पाच किलोमीटर अंतराकरीतादेखील रस्ता नसल्याने पटकीच्या पाड्यातील नागरिक व रुग्णांची गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१८ मध्ये पटकीचा पाडा येथील रस्त्यासाठी २ कोटी ७२ लाख रुपये मंजूर करण्यात आले होते मात्र या रस्त्याचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पटकीचा पाडा ते वेळूक पर्यंतचा रस्ता निधी मंजूर होऊनही प्रलंबित असल्याने ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याने सदर रस्ता लवकरात लवकर पूर्ण करुन सुयोग्य आरोग्य सुविधा पुरविण्याकरीता शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

शहापूर तालुक्यातील वेळूक ते पटकीचापाडा हा रस्ता ग्रा.मा.५४ असून त्याची लांबी ३.५० कि.मी. आहे.तसेच वाशाळा ते वेळूक हा ४.८०० कि.मी. लांबीचा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून तयार करण्यात आला असून त्यावर रूपये २२६.०२ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे आणि आजरोजी रस्ता सुस्थितीत आहे.मात्र वेळूक ते पटकीचापाडा या रस्त्याबाबत नियमित उद्दिष्टांतर्गत तसेच संशोधन व विकास अंतर्गत निवडीकरीता प्रचलित धोरण,उपलब्ध निधी व प्राथम्यक्रमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अमृत सरोवर योजनेमध्ये निधीचा गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४४) * २१६८६ श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १९१५५ ला दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील ग्रामीण भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्यासाठी मा.पंतप्रधान यांच्या आवाहनानुसार दिनांक २४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा एक भाग म्हणून दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षात देशातील प्रत्येक जिल्ह्यात ७५ अमृत सरोवर बांधण्याचा संकल्प करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तदनुषंगाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात उक्त कार्यक्रमांतर्गत ७५ अमृत सरोवर निर्माण करणे तसेच पुनर्जिवीत करण्याकरीता शासनाकडून निधी वितरीत करुनही दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ अखेर पर्यंत बहुतांश जिल्ह्यात अमृत सरोवर निर्माण करण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विहीत कालावधीत अमृत सरोवर निर्माण न करताच पुर्वीचेच सरोवर अमृत सरोवर म्हणून दाखविण्यात येवून निधीचा अपहार केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अमृत सरोवर बांधण्यास विलंब करणाऱ्या व पुर्वीचे सरोवर अमृत सरोवर दर्शविणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## नागपूर शहरात तिरंदाजी व शुटींग स्पर्धेकरीता आवश्यक प्रशिक्षक तथा प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४५) * २१५५२ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेकरीता आवश्यक सर्व सुविधायुक्त प्रशिक्षक व प्रशिक्षणाची सोय उपलब्ध नसल्याचे तसेच अलिकडे झालेल्या आशियाई स्पर्धेत तिरंदाजी विश्वस्तर स्पर्धेत स्वर्ण पदक प्राप्त क्रिडा स्पर्धकाला आवश्यक तिरंदाजी तथा इतर प्रशिक्षणासाठी उपलब्ध सुविधाअभावी सातारा व त्यानंतर सोनिपत येथे प्रशिक्षणासाठी जावे लागल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आवश्यक धनुर्विद्या तथा शुटींगकरीता लागणारी पायाभूत सोयीसुविधा तथा आंतरराष्ट्रीय प्रशिक्षकाद्वारे प्रशिक्षण देण्याची सुविधा केंद्र नागपूर शहरात उपलब्ध नसल्याने प्रशिक्षणाअभावी अनेक प्रशिक्षणार्थींना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी होता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरात आंतरराष्ट्रीय सर्व क्रीडा स्पर्धाकरीता आवश्यक सर्व सोयीसुविधांयुक्त प्रशिक्षण केंद्र, मैदान, पायाभूत सोयीसुविधा व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षकांची सोय उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणंती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

नागपूर शहरामध्ये धनुर्विद्या या खेळाचे विभागीय क्रीडा संकुल, कोराडी रोड, मानकापूर, प्राचार्य अरुणराय कलोडे महाविद्यालय, तिरपुडे महाविद्यालय, नागपूर महानगर पालीकेच स्टेडियम, उमरेड रोड, रामनगर क्रीडांगण धरमपेठ सायन्स कॉलेज, बालपांडे फार्मसी कॉलेज इत्यादी ठिकाणी प्रशिक्षण सुविधा उपलब्ध आहेत. तसेच शुटींग या क्रीडा सुविधासाठी तालुका क्रीडा संकुल उत्तर नागपुर, ए.सी.ई. स्पोर्टस अ‍ॅकेडमी बेझन बाग, ऑरेंज सिटी स्पोर्टस कॉम्पेक्स, के टी नगर, स्वावलंबी नगर येथे राष्ट्रीय दर्जाची अद्यावत व सुसज्ज अशी १० मी शुटींग रेंज उपलब्ध आहे.

(३) विभागीय क्रीडा सकुल, नागपुर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची सुसज्ज आर्चरी रेंज, क्रीडा साहित्य व प्रशिक्षण सुविधा तसेच जिल्हा कीडा संकुल या ठिकाणी शुटींग, क्रीडा साहित्य उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.